म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा. वा
दा. क्र. ६९६५

IRBK-0106965
IRBK-0106965

# श्री संत तुकाराम

5 SEP 1977

गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

[illegible]
क्र. ६२६५
[illegible]

IRBK-0106965
IRBK-0106965

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.

मुद्रक व प्रकाशक :
दामोदर त्र्यंबक जोशी, बी. ए. (टिळक),
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २.

* * *

प्रथमावृत्ति सन १९५४
द्वितीयावृत्ति सन १९५८

* * *

प्रथमावृत्तीखेरीज शेष
सर्वाधिकार लेखकाधीन

अनुक्रम..............
विभाग...............
क्रमांक ..........
नों. दि. .......

# प्रस्तावना

‘श्री सन्त तुकाराम’ हें लहानसें पुस्तक श्री. गोपाळराव दाण्डेकर यांनीं लिहिलें आहे इतकें सांगितलें कीं तें प्रसादपूर्ण, रसाळ, वाचावयास घेतलें कीं संपेपर्यंत खालीं ठेववत नाहीं असें आहे, असें वेगळें सांगण्याचें कारण नाहीं. श्री. गोपाळराव यांच्यासारखा सन्तांच्यावर निष्ठा असणारा भक्तिमान् लेखक, चरित्र बालांच्याकरितां व चरित्राचा विषय तुकोबा असा त्रिवेणी–संगम झाल्यावर श्री. गोपाळरावांच्या स्फूर्तिगंगेस रसाचा पूर येऊन त्यांत वाचक कडेपर्यंत तरंगतच जावा यांत आश्चर्य तें काय ?

चित्रशाळेच्या व्यवस्थापकांनीं श्री. गोपाळराव यांच्याकडून बालवाचकवर्गाकरितां इतर महाराष्ट्रीय व महाराष्ट्राबाहेरचे सन्त यांचीं चरित्रें लिहून घेण्याचें ठरविलें आहे याबद्दल व्यवस्थापकांचें अभिनंदन करणें अवश्य आहे. कारण या त्यांच्या कृतींत त्यांनीं समसमा असा योग साधला आहे.

श्री. गोपाळराव यांची लेखनशैली अशी आहे कीं, वाचतांना असें वाटतें कीं, वर्णिलेल्या घटना जणूं आपल्या डोळ्यांसमोर घडत आहेत. हें चरित्र मुलांच्याकरितां लिहिलेलें असल्यानें श्री. गोपाळराव यांनीं, तुकोबांनीं हुतुतू, हमामा वगैरे खेळांवर जे रूपकात्मक अभंग रचले आहेत त्यांचा तुकोबांचें चरित्र

समजून देण्यांत व उपयोग करण्यांत चांगली कुशलता दाखविली आहे.

या चरित्राच्या बाबतींत जातां जातां एका गोष्टीकडे लेखकाची व त्याबरोबरच वाचकांची नजर वेधणें अवश्य आहे. प्रकरण नववें, गुरुकृपा यांत तुकारामांची परंपरा सांगतांना राघव चैतन्य – त्यांचे केशव चैतन्य – केशव चैतन्य राघवचैतन्यांचे गुरु असा अर्थ निष्पन्न होतो. वास्तविक वस्तुस्थिति उलट आहे. शिवाय या तीन पिढ्या नाहींतच. दोन पिढ्यांचेंच वर्णन आहे.

हें पुस्तक माझे गुरुबंधु वै. ह. भ. प. मारुतिबोवा गुरव, आळंदी यांच्या स्मृतीस अर्पण केलें आहे तेंहि योग्यच झालें आहे.

तुकारामबीज
शके १८७५.

शं. वा. दाण्डेकर

*वारकरी पंथांतील*

*माझे आचार्य*

*वैकुण्ठसुखनिवासी*

**गुरुवर्य मारुतीबुवा गुरव**

*यांचे स्मृतीस–*

**गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | पावन तो देश | १ |
| २. | पवित्र तें कुळ | ४ |
| ३. | जन्म–बालपण | ८ |
| ४. | लग्न अन् संसार | १५ |
| ५. | पहिला घाव | २१ |
| ६. | दुष्काळ | ३३ |
| ७. | साधना | ४२ |
| ८. | उपासना | ५५ |
| ९. | गुरुकृपा | ६१ |
| १०. | अभंग–रचना | ६४ |
| ११. | छळ | ६७ |
| १२. | परीक्षा | ७४ |
| १३. | उदकामार्जी वह्या | ७७ |
| १४. | जयजयकार | ८५ |
| १५. | दिवट्या छत्री घोडे | ८९ |
| १६. | तुका जातो वैकुंठाला | ९४ |

# १. पावन तो देश

मावळ भाग – फार सुंदर आहे तो. अगदीं आजहि सुंदरच आहे. तीन नद्या वाहतात त्याच्यांतून. एक इंद्रायणी. दुसरी पवना. तिसरी आंद्रा.

इन्द्रायणी – तिचं वर्णन काय करूं? तिचा उगम देखणा. तिच्या कांठीं गांवं देखणीं. ती भीमेला जाऊन मिळाली. तो संगमहि देखणाच !

लोणावळ्याजवळून निघाली ती. उणीपुरी चाळीस मैल लांबी. पण मोठ्या मोठ्या गंगायमुनांनीं तिचा हेवा करावा, असं तिचं भाग्य !

काय भाग्य आहे तिचं ?

कसं सांगूं ? तिच्या कांठावरल्या एका झोपडींत मराठी भाषेचा आदिकवि जन्मला. तिच्या कांठीं नाचून खेळून मोठा झाला. अन् शेवटीं तिच्याच कुशींत विसांवला. फार मोठा संत. बालब्रह्मचारी. बुद्धीचा आगळा. अवघ्या संतांहून वेगळा. ज्ञानेश्वर त्याचं नांव.

हें झालं सातशें वर्षांपूर्वीं. पण एवढ्यानंच इन्द्रायणीची कूस रिती झाली नाहीं. कशी रिती होईल ?

तिचा कांठ मोठा श्रीमंत आहे. कशानं ? धनसंपत्तीनं ? असेल कदाचित्. किंवा नसेलहि. पण धर्मसंकीर्तन – तें मात्र आज हजार दोन हजार वर्षं होतंय तिच्या दोन्ही कांठांवर.

तत्रभवान् बुद्धानं आपलं धर्मसंकीर्तन उत्तरेंत केलं. पण त्याचा पडसाद आला दक्षिणेपर्यंत. दक्षिणेंतल्या राजांनीं बौद्ध भिक्खूंना

राहाण्यासाठीं विहार बांधून दिले. ते शान्तिदूत विहार इन्द्रायणीच्या उजव्या अन् डाव्या थडीवर आहेत. कार्लें आणि भाजें.

हें झालं प्रसिद्ध विहारांचं. अन् डोंगरांच्या कुशींत झांकून असलेलीं लेणीं ? तीं तर कितीतरी आहेत या इन्द्रायणीच्या परिसरांत. यादी देत बसत नाहीं. पण भामचंद्र डोंगर, भंडाऱ्या डोंगर, घोराड्या डोंगर, या देहूच्या पंचक्रोशींतल्या डोंगरावरच बुद्धकालीन् लेणीं अन् गुंफा आहेत !

अशा तपोभूमींत इन्द्रायणीच्या पावन तीरावर आहे देहू गांव. छोटासाच आहे. आजहि वस्ती तीन चार हजारांपलीकडे नाहीं. त्यांत आज तर देहू गांव तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. मग तीनशें वर्षांपूर्वीं तिथें कितीशी वस्ती असेल !

गांव लहानसा, पण मोठा छान आहे. छान म्हणजे बागांनीं भरलेला नाहीं. छान म्हणजे सृष्टिसुंदर. मावळतीकडे तोंड करून रावळांत उभं राहावं, म्हणजे मन वेडावून जातं.

समोर दिसतो घोराड्या. मधें भंडाऱ्या. भंडाऱ्या हा एकांडा शिलेदार, सुढ़ंवरें अन् इन्दुरी यांच्यामध्यें एकटाच उभा आहे. मस्तकावर एक पंढरिनाथाचं राऊळ साजतं आहे. अन् उजव्या: हाताला आभाळाशीं गोष्टी बोलतोय् भामनाथ.

या डोंगरांच्या मागं सह्याद्रीचा दांड उभा आहे.

हें झालं दूरचं. जवळचं ?

अगदीं देहूशीं अंग घाशीत वाहात्येय् इंद्रायणी. गांवाजवळ पाणी आपलं झुळुझुळु वाहातंय. पण पुढं मग भला थोरला डोह आहे. खूप लांब. बराच खोल. इन्द्रायणीच्या दुतर्फ आहे जांभळीची नि पिंपरीची छाया. अगदीं आजहि हें असं आहे. मग त्या वेळीं ?

जेव्हां या देशाचे डोंगर कोळसे पाडण्यासाठीं झाडं तोडून बोडके केले नव्हते, जेव्हां आपरुकीनं आमराया लावल्या जात अन् जोपासल्या जात तेव्हां ?

तेव्हां तर देहूचं रूप आगळं असेल. भोंवतालीं आमराया असतील. पारंब्यांचा आधार घेऊन उभे राहिलेले वड असतील. त्या वडापिंपळाखालीं देखणीं देवळं असतील.

पण असतील तरी कशाला ? हें घ्या देहूचं वर्णन.

**धन्य देहूगांव पुण्यभूमी ठाव । तेथें नांदे देव पांडुरंग ॥**
**धन्य क्षेत्रवासी लोक ते दैवाचे । उच्चारिती वाचें नामघोष ॥**
**कर कटीं उभा विश्वाचा जानिता । वामांगीं ते माता रखुमाई ॥**
**गरुड पारीं उभा जोडोनियां कर । अश्वत्थ समोर उत्तरामुख ॥**
**दक्षिणे शंकर लिंग हरेश्वर । शोभे गंगातीर इन्द्रायणी ॥**
**लक्ष्मीनारायण बल्लाळाचें वन । तेथें अधिष्ठान सिद्धेश्वर ॥**
**विघ्नराज दारीं बहिरव बाहेरी । हनुमंत शेजारीं सहित दोघे ॥**

अगदीं ऐतिहासिक पुरावा आहे बरं का हा !

देहूगांव ही पुण्यभूमि आहे. तिथं पांडुरंग नांदतो आहे. कटीवर कर आहेत. वामांगीं रखुमाबाई उभी ठाकली आहे. समोर पारावर गरुड उभा आहे. श्रीहरीच्या उत्तरेला पिंपळ डोलतो आहे. दक्षिणेला हरेश्वर ध्यानस्थ बसला आहे. समोरून गंगामाई इंद्रायणी वाहात्येय्. शेजारीं बल्लाळाचं वन आहे. त्यांत नानापरींचीं झाडं आहेत. फुलं फुलताहेत, डोलताहेत. त्या वनांत लक्ष्मीनारायण उभा आहे. या सगळ्यांचं अधिष्ठान आहे सिद्धेश्वर. गणराय दारावर उभे राहून विघ्नांचं निवारण करताहेत. अन् मदतीला आहेत बहिरव आणि मारुतिराय !

कुण्याहि भक्ताचं, सज्जनाचं मन आनंदानं मोहरून जावं, असं आहे हें वर्णन.

अन् या गांवीं—

या पवित्र क्षेत्रांत एक पुरुष जन्मला. सगळ्या तीर्थांनीं त्याच्या चरणधुळीनं पवित्र व्हावं असा.

त्याचं नांव—

तुकोबाराय !

* * *

## २. पवित्र तें कुळ ....

मराठी राज्यांत वतनकरी असत. त्यांतलं एक वतन महाजनकीचं.

महाजन म्हणजे मोठा माणूस. सगळ्या गांवचं पोटपाणी त्याच्या जिवावर चालायचं. त्यानं गांवाला धान्य, मीठ, गूळ, मीठ, मिरची, मसाला हें सगळं आणून पुरवायचं. त्या कामासाठीं त्याला एखादं शेत इनाम दिलेलं असायचं.

देहूंतहि वतनकरी होते. पाटील होते. कुलकर्णी होते. जागल्ये होते. येसकर होते. तसेच महाजनहि होते. त्यांची कुळी मोरे. आडनांव आंबिले.

या मोरे कुळींत एक भगवद्भक्त जन्माला आला. त्याचं नांव विश्वंभर. वडील लहानपणींच वारले. पण म्हातारीनं आपलं हें लेंकरूं मोठ्या कौतुकानं सांभाळलं. नुसतं सांभाळलं नव्हे; त्याला सांगितलं,

"बाळा ! आपली कुळी वारकऱ्यांची. दर आषाढी-कार्तिकीला वाडवडील पंढरी आळंदी करीत आले. त्यांनीं हें व्रत इथपर्यंत आणून पोंचिवलं. तूं त्यांत अंतराय पडूं देऊं नकोस."

विश्वंभरानं आईची ही आज्ञा उरींशिरीं वागविली.

चार कोसांवर आळंदी. तिथं ज्ञानोबा माउलीचा ठाव. त्या वारकरी

सांप्रदायाचा पाया रचणाऱ्याचा शेजार. विश्वंभरानं वारंवार आळंदीला जावं. ज्ञानोबाच्या भेटीचा लाहो घ्यावा. त्यांना म्हणावं,

" माउली ! मला तुमच्या मंडळांत सरता करून घ्या ! "

जणूं ज्ञानोबांनीं तें ऐकलंच. वारकरी मंडळी पंढरीला जात. त्यांच्या-बरोबर टाळ-पताका घेऊन विश्वंभर निघाला. वाटेंत त्यानं पंढरिरायाचे गुण ऐकलेन्. नामस्मरणाचा छंद तर लागलाच होता. जसंजसं पंढरपूर जवळ येऊं लागलं तसतसा प्रेमा वाढत चालला.

" दिसलं; शिखर दिसलं. पंढरिरायाच्या मंदिराचा कळस दिसतोय्. आतां माझा पंढरिनाथ मला भेटेल ! मी त्याला डोळाभरी पाहीन. त्याच्या चरणांवर हें भाळ टेकून कृतकृत्य होईन ! "

शेवटीं विश्वंभर रावळांत जाऊन उभा राहिला. विटेवर उभी अस-लेली साजिरी गोजिरी मूर्ति त्यानं पाहिली. ज्ञानोबाला, नामदेवाला, चांगदेवाला, मुक्ताबाईला, चोखोबाला जिचा छंद लागला होता, ती मूर्ति.

विश्वंभराचे डोळे आंसवांनीं भरून आले. त्यानं विठ्ठलमूर्तीच्या चरणांवर मस्तक ठेवून म्हटलंन्,

" श्रीहरी ! सांवळ्या ! शेवटीं येऊन पोंचलों तुझ्या चरणीं ! आतां अंतर देऊं नकोस ! "

मग विश्वंभरला तो नादच लागला.

आईनं लग्न करून दिलंन्. बाईल मिळाली, तीहि विश्वंभराला साजेशी. आमाई तिचं नांव. मग काय, विश्वंभर पंढरीशिवाय दुसरं कसलं नांव घेईना !

दर शुद्ध एकादशीला त्यानं पंढरीला जावं; दुकानाकडलं लक्ष कमी झालं. निंदा व्हायला लागली. आई आणि बाईल, दोघी किती सांभाळणार दुकान !

शेवटीं विठ्ठलालाच करुणा आली. एका रात्रीं विश्वंभरबुवांना दृष्टान्त झाला.

" विश्वंभरा, तुझी एकनिष्ठा माझ्या मनास आली. आतां तुला पंढरीला यायचं कांहीं कारण नाहीं. मीच तुझ्या गांवीं येतों ! शेजारच्या आंबराईंत माझा शोध घे."

विश्वंभरबुवा आनंदून उठले. त्यांनीं बायकोला अन् आईला हांक मारली.

" आई ! मला दृष्टान्त झाला ! "

" कसला ? "

" पंढरिराय आपल्या घरीं आले ! "

सकाळीं हार, बुक्का, तुळशी, दिंडी हें बरोबर घेऊन विश्वंभरबुवा आंब्याच्या वनांत गेले. पण या तुळशी अन् फुलांचं कांहीं कामच पडलं नाहीं. तिथं एका आंब्याखालीं हें सगळं अंथरलं होतं. विश्वंभरबुवांनीं आपल्या हातानं ती जागा उकरली. पाहातात तों काय !

श्रीहरीची सगुण मूर्ति ! शेजारीं रखुमाबाई ! मूर्तीच्या गळ्यांत तुळशीचे हार. जणूं कोणीं आतांच करून घातले आहेत

**पुढें पाहातां निजदृष्टीनें । तों पांडुरंग मूर्ती सांवळी सगुण ॥**
**वामांगीं ते माता रुक्मिणी । सुकुमार ठाण साजिरें ॥**
**कासेसी दिव्य पीतांबर । गळां तुळसी-मंजिऱ्यांचे हार ।**
**ऐसी मूर्ति देखोनि सुंदर । जयजयकार मग करिती ॥**

मग स्वतः विश्वंभरबुवांनीं मूर्ति उचलून मस्तकावर धारण केली, टाळ खणखणूं लागले. मृदंग धुमधुमायला लागले. भजनाचा एकाकार गजर सुरू झाला. वाजतगाजत मूर्ति गांवांत आणली.

विश्वंभरबुवा आईला म्हणाले,

" आई, देव तुझ्या घरीं आला. आतां याला राहायला जागा ? "

" काय करतोस? कुठं ठेवतोस?"

" राऊळ बांधायचं घराशेजारीं."

छोटंसं, देखणं देऊळ बांधलं विश्वंभरबुवांनीं. त्यांत श्रीहरीला उभं केलं. समोर गरुड शेजारीं रामराय असं पंचायतन सजवलं. हरि-नामाचा गजर सुरू झाला. दर एकादशीला देहूला यात्रा जमायला लागली.

विश्वंभरबावांना दोन मुलं. हरी आणि मुकुंद. तीं दोघं मोठीं झालीं. विश्वंभरबुवा वैकुंठवासी झालेले. मागं आई तेवढी राहिलेली. राज्यावर परचक्र आलं. त्या हरी-मुकुंदांच्यानं स्वस्थ बसवेना. ते आईला म्हणाले,

" आई, आम्ही लढायला जातों."

" पंढरिरायाचे पाय सोडून?"

" पंढरिनाथ सगळीकडे भरून उरला आहे. त्याच्या आज्ञेचं पालन करतोंय् आम्ही; त्यानं अर्जुनाला लढायला सांगितलं. परचक्र आल्यावर आमच्यानं हातावर हात ठेवून काळ काढवत नाहीं."

" तुमची इच्छा! काय पटेल तें करा!"

ते दोघे निघाले. तोंवर परचक्र निघून गेलं होत; पण हातीं तरवार धरली, ती टाकवेना. मग ते दोघेहि राजाच्या पदरीं राहिले. आमाबाई-लाहि तिथं त्यांच्याजवळ जावं लागलं.

तो काळ अंदाधुंदीचा. काय होईल, अन् केव्हां होईल, हें सांगतां यायचं नाहीं. पुन: राज्यावर हल्ला झाला. हे दोघे तरवारी कमरेला बांधून निघाले. जातांना आईला अन् बायकांना सांगितलं,

" युद्धाला निघालोंय्. परत आलों तर तुमचे; नाहींतर देशासाठीं खर्च झालों असं समजा! आम्ही परत आलों नाहीं, तर देहूला जा. पंढरिरायाला आमचे नमस्कार सांगा. म्हणावं, शेवटपर्यंत तुझी आज्ञा मोडली नाहीं!"

ते दोघे लढायला गेले ते गेलेच. तिथंच धारातीर्थी पडले. वार्ता घरीं आली. मुकुंदाची बाईल वेडीपिशी झाली. ती म्हणाली,

"मी सती जाणार!"

आमाईवर तर कडाच तुटून पडला. दोन्ही मुलं गेलीं. सूनहि चालली त्याच वाटेनं. दुसरीचे हात धरून आमाबाई रडत म्हणाली,

"बाई माझ्या! तूं तरी सती जाऊं नकोस. तुझ्या पोटांत वंश वाढतोय्!"

सती मुकुंदाच्या प्रेताला बरोबर घेऊन चितेंत जळाली. हूं का चूं केलं नाहीं तिनं. मग डोळे पुशीत आमाबाई दुसऱ्या सुनेला घेऊन देहूला परतली. मूल झालं, त्याचं नांव ठेवलं विठ्ठल. विठ्ठलाचा पदाजी, त्याचा शंकर, त्याचा कान्हया, त्याचा बोल्होबा, अशी वंशपरंपरा

बाप फार मोठा भक्त, तर लेक फार मोठे झुंजार. भक्ति आणि शौर्य, दोन्ही हातांत हात घालून चालताहेत. अशी कुळी लाभली तुकोबांना, म्हणूनच त्या कुळाचं नांव त्यांनीं आणखीनच उजळलं. मोठ्या झुंजारपणानं भक्ति केली त्यांनीं.

**वीर विठ्ठलाचे गाढे । कळिकाळ पायां पडे ॥**

हें वचन जगून दाखवलं.

* * *

## ३. जन्म—बालपण

बोल्होबाहि मोठा साजरा माणूस. बायकोचं नांव कनकाई. नांवं आपलीं ओबडधोबडच. पण गुण? ते सगळ्या जगाहून आगळे. दुकान नेटकेपणानं चालवलं बोल्होबानं. शेतीहि ठाकठीक पिकविली. कांहीं थोडी सावकारीहि केली. पण सचोटीनं. पैचीहि लबाडी व्हायची नाहीं हातून. नडला यायचा, पडला यायचा—

"बोल्होबा, लेकीचं लगीन धरलंय्. जवळ तांबडा रुका नाहीं."

"ने बाबा शंभर होन. सवड झाल्याबरोबर आणून दे."

"बोल्होबा, धान्य सरलं, दाणा नाहीं घरांत."

"ने बाबा दोन मण. पिकलं म्हणजे आणून दे."

"बोल्होबा, पेरण्या उभ्या राह्यल्या डोईवर. बी नाहीं चिमूटभर."

"ने बाबा चार पायल्या. खळं भरलं, कीं परत कर."

असा जगाच्या उपयोगी पडायचा बोल्होबा. देहूच्या चहूंकडे बोलबाला होता त्याचा. साधुसंत यायचे. त्यांचं स्वागत करायचं. भुकेल्याला भाकरी. तान्हेल्याला पाणी. आजाऱ्याला औषध. भजन-कीर्तन. असा चालला होता बोल्होबाचा प्रपंच.

एकनाथ महाराज आळंदीला आले. समाधींत शिरून ज्ञानोबांना भेटले. त्यांच्या गळयाशीं भिडलेली अजानवृक्षाची मुळी काढली. ती गोष्ट चहूंकडं जाहीर झाली. दशक्रोशींतून मंडळी नाथांच्या दर्शनाला यायला लागली.

बोल्होबांनीं ऐकलं. ते आणि कनकाई, दोघं निघालीं बैलगाडींत बसून. आळंदीला गेलीं. तिथं एकनाथांचं दर्शन घेतलं. संतसमागम केला. मग दोघं परत आलीं.

अशी संतसेवा हातून घडली. फळहि तसंच मिळालं.

पहिला लेक झाला. त्याचं नांव सावजी ठेवलं. त्या लेंकराच्या दुडुदुडु धांवण्यानं अन् गोडगोड बोलण्यानं या दोघांचंहि मन निवायला लागलं.

तो ३।४ वर्षांचा झाला, तों दुसऱ्या पाळीला कनकाईला डोहाळे लागले. बोल्होबांनीं तिला पुसलं,

"तुला काय करावंसं वाटतं?"

लाजून कनकाई म्हणाली,

"मला भजन करावंसं वाटतं, कीर्तन करावंसं वाटतं. हरिरंगणीं नाचावंसं वाटतं. साधुसंतांचं दर्शन घ्यावंसं वाटतं."

हळू हळू दिवस भरले. कनकाई एकटीच रावळांत जाऊन वसायची. पांडुरंग–रुक्मिणीला न्याहाळायची. अन् म्हणायची,

"श्रीहरी! तूं चांगला आहेस!"

असं भजन चाललं, श्रवण चाललं, स्मरण चाललं, पूजा चालली, पादसेवन चाललं. भक्तीचे नऊहि प्रकार हातून यथासांग पार पडले.

आणि फळ?

फळहि मिळालं, एका चांगल्या निरभ्र दिवशीं कनकाईला बाळ झालं!

**नवविधा भक्ति केली सायास।**
**तेचि पूर्ण झाले नव मास।**
**कनकाईचें भाग्य विशेष।**
**विष्णुभक्त उदरासी आला कीं॥**

बाळाचं नांव ठेवलं तुकाराम. हळू हळू बाळ वाढायला लागलं. बोल्होबाच्या घरीं सुख नांदत होतं. दुधातुपाची उणीव नव्हती. त्या दुधांत, त्या तुपांत, त्या लोण्यांत, त्या दह्यांत, त्या सुखांत बाळ मोठं होतंय्.

घरीं शेत होतं. गुरं होतीं. गाई होत्या. म्हशी होत्या. गाईम्हशी राखायला गडी. ते बाळाला खांद्यावर घेऊन नदीवर न्यायचे. ती नदी, तो घाट, तीं मस्ती करणारीं पोरं, ते पिंपळ, ते वड, हें सगळं बाळानं लहानपणींच पाहून घेतलं. त्या सगळ्यांशीं ओळख करून घेतली. म्हणून तर पुढं अभंग केला—

**वृक्षवल्ली आम्हां वनचर सोइरे।**
**पक्षीही सुस्वरें आळवीती॥**

बोल्होबा पंढरीचे वारकरी. दर आषाढीला अन् कार्तिकीला त्यांनीं पंढरीला जावं. जातांना बैलगाडींतून आपल्या या लहानग्यालाहि

न्यावं. तें भजन, तो सोहळा, पुंडलीक, वाळवंट, साधुसन्त, हें सगळं बाळाला अगदीं लहानपणीं जवळून पाहायला मिळालं. घरीं पंढरीच्या वारीचा नेम. ती वारी लहानपणापासून मरेसांत असली.

पंढरीची वारी आहे माझ्या घरीं ।
आणिक न करीं तीर्थव्रत ॥

बाळ ८।१० वर्षांचा झाला. कधीं कधीं गाई घेऊन तुकारामानं स्वतः जावं. इन्द्रायणीच्या तीरावर गुरं लावून द्यावींत. अन् आपण बसावं एखाद्या झाडाखालीं. पलीकडं एखाद्या गुराखी पोरानं पांवा वाजवीत असावं. लगेच तुकारामाला नामदेवाचा अभंग आठवावा.

"माझा स्वामी श्रीहरी देहुडा—दिडका—पाय ठेवून वेणू वाजवीत आहे. तो यमुनातीरीं उभा आहे. त्याच्या मस्तकावर मोरपिसांचा मुगुट आहे. असा तो सगुण मेघःश्याम लावण्यसुंदर हरी मला फार आवडतो."

देहुडा चरणीं वाजवितो वेणू ।
गोपिकारमणू स्वामी माझा ॥
देखिला गे माये यमुनेच्या तीरीं
सगुण मेघश्याम लावण्य सुंदर ।
नामया दातार केशीराज ॥

अन् मग तुकारामानं त्या ध्यानांत मग्न होऊन जावं.

इन्द्रायणीच्या पैलतीरावर येलवाडी अन् सुदुंबरें. तिथलींहि पोरं गुरं चारायला यायचीं. त्यांतला एक संताजी तेली. आडनांव जगनाडे. तुकारामाची अन् संताजीची मोठी दोस्ती. दोघांनीं गुरं एका ठिकाणीं करावीं. नदीतीरानं लावून द्यावीं, अन् मग बसावं भजन करीत. तुकाराम कितीतरी अभंग म्हणायचा. नामदेवाचे, एकनाथाचे,

ज्ञानोबाचे. रोज देवळांत भजन व्हायचं. तिथं त्याला ऐकायला मिळायचं. त्याचे पाठ झाले ऐकून ऐकून.

संताजी विचारायचा,

" तुका, तुला कसे अभंग येतात रे इतके ! "

" मला येतात."

" मग मला कां नाहीं येत ? "

" तूं पाठ करीत नाहींस."

" तूं शिकवशील ? "

" हो, शिकवीन ! "

अन् तेव्हांपासून ते लहानगे गुरुशिष्य अभंग शिकायला अन् शिकवायला लागले. तुकाराम अन् संतोबा. गाई चारतांना जोडी जमली. ती अगदीं शेवटपर्यंत टिकली. तुकोबांचा एक अभंग आहे.

चारितां गोधन । माझें गुंतलें वचन ।।
आम्हां झालें येणें । एका तेलियाकारणें ।।

पण हीं पोरं कांहीं नुसतंच भजन करीत नसत. तीं खेळहि खेळायचीं.

नानापरीचे खेळ. आतां नांवहि माहीत नसतील कुणाला. तुकोबारायांचा आणखी एक अभंग आहे. त्यांत ते म्हणतात,

बाळपणीं ऐसीं वरुषें गेलीं बारा ।
खेळतां या पोरा नाना मतें ।।
विटीदांडू चेंडू लगोऱ्या वाघोडी ।
चंपे पेंड खडी एकी बेकी ।।
हमामा हुंबरी पकव्याचे बारे ।
खेळे जंगी भोंवरे चुंबाचुंबी ।।
सेलडेरा आणि निसर भोंवंडी ।
उचले बोले धोंडी अंगबळें ।।

कितीतरी खेळ. सगळं बालपण खेळतांना गेलं.

कांहीं खेळांचीं नांवं आहेत यांत. कांहींचीं नाहींत. सात आठ खेळांचं वर्णन बाबांनीं मोठ्या विस्तारानं केलं आहे.

पोरं रानभर गुरं चारीत पसरलेलीं असायचीं. तुकाराम म्हणायचा,

" या रे गड्यांनो ! असे पांगलांत काय ! आपण सगळे मिळून खेळ खेळूं."

**°आपआपणांमध्यें मिळों । एक खेळों एकाशीं ॥**

पोरं म्हणायचीं,

" काय खेळायचं ?"

" काय खेळायचं बरं ? चला, हुतुतू खेळूं."

अन् मग इन्द्रायणीच्या तीरावरल्या एखाद्या गव्हाळींत डाव सुरू व्हायचा हुतुतूचा. तुकाराम मोठा चपळ खेळाडू. त्यानं मागं पुढं पाहून खेळूं लागावं. म्हणजे कुणाच्या हातीं सांपडायचा नाहीं. त्याचा दमहि पक्का. मग त्याच्याकडले गडी त्यालाच वारंवार पाठवायचे. तो म्हणायचा—

" मी एकटाच कशाला जाऊं ? बाकीच्यांना जाऊं द्या ना !"

" नाहीं. तुका, तुझा दम खूप आहे. तूंच जा."

मग तुकारामानं जावं, अन् खेळी जिंकून यावं. त्यानं हुतुतूतले बारकावे लिहून ठेवले आहेत.

**मागेंपुढें पाहे तो जिंके ॥**
**दम पुरे तो वेळोवेळां खेळे ॥**
**दम पुरे तो खेळियां चांग ॥**

कांहीं वेळानं पोरांनीं म्हणावं,

" तुका, आतां पुरे झालं गड्या. दुसरं कांहीं खेळूं."

"बरं. काय खेळतां ?"

"तूंच सांग."

"हमामा खेळूं आपण."

मग सगळीं पोरं एकमेकांच्या खांद्यावर हात ठेवून घुमायला लागायचीं.

हमामा रे पोरा हमामा ॥
घुमरी वाजे घुमामा ॥

एखादं बारकं पोर म्हणायचं,

"हें रे काय तुका ! आम्हांला कोणी घेतच नाहीं खेळायला !"

हमामा थांबवून तुकारामानं म्हणावं,

"गडे हो, आतां आपण चेंडू खेळूं, म्हणजे या बारक्यांनाहि खेळतां येईल."

मग सगळीं पोरं शेतभर पांगायचीं. अन् सुरू व्हायची चेंडूची फेकाफेकी. ज्याच्या हातून चेंडू सुटायचा, त्याच्या पाठींत चेंडूचा टोला बसायचा. अन् मग त्याला सगळीं पोरं हसायचीं.

झेला रे झेला वरचेवर झेला ॥
हातींचें गमावी तो पाठीं साहे टोला ॥

एखादे दिवशीं आट्यापाट्यांचा डाव पडायचा. तुकाराम दुधा-तुपाचा गडी. तो काय ऐकतोय कुणाला ? कुठं कोंडी धरली कीं तुकाराम तींत उडी घालायचा. अन् शिताफीनं हातीं न लागतां फळी फोडून बाहेर पडायचा.

बळिया गडी फळी । फोडी न धरितां त्यासी ॥

अन् मग खेळ घुमायचा विटीदांडूचा. गली तयार व्हायच्या. पोरं विटी कोलायचीं, झेलायचीं; ज्याची कोललेली विटी झेलली, तो गडी बाद झाला.

कोली हाणी टोला । झली तेणें तो गोंविला ॥

खेळ खेळून पोरं दमलीं, कीं भुका लागायच्या. प्रत्येकाच्या बरोबर शिदोरी, नाना प्रकारची. तुकारामाच्या अभंगांतून त्या शिदोरीचीं वर्णनं आलीं आहेत. दहीं, भात, ताकाचं लोटकं, भाकरी, बाजरीचा खिचडा, लोणी, आंब्याचं लोणचं, भोंकराचं लोणचं, नानापरी. तुकाराम म्हणायचा,

"गडे हो, आतां खेळ पुरे झाला. गाई वळत्या करूं. एका ठिकाणीं बसून जेवूं. खांद्यावर शिदोरीचा भार आहे, अन् पोटांत भूक आहे. मग आतां खेळतांना सुख कसं व्हायचं?"

चला वळूं गाई । बैसूं जेवूं एके ठाईं ॥
बहु केली वणवण । पायपिटी झाला सीण ॥
खांदीं भार पोटीं भूक । काय खेळायाचें सुख ॥

सगळीं पोरं आंब्याच्या झाडाखालीं बसायचीं. गंमत जंमत करीत शिदोऱ्या खायचीं.

इंद्रायणीचं पाणी प्यायचीं, अन् डराडरा ढेंकरा द्यायचीं.

असं हसतखेळत बाळपण गेलं, अन् मध्येंच एक प्रसंग घडला.

* * *

## ४. लग्न अन् संसार

बोल्होबा अन् कनकाई, दोघांनाहि वाटलं, पोर आपला लग्नाला आला. आतां याचं लग्न करून द्यायला हवं. त्या काळीं लग्नं लहानपणींच व्हायचीं. बाराचौदा वर्षांचा मुलगा, म्हणजे डोईवरून पाणी गेलं.

तुकाराम बारा वर्षांचा असतांना त्याचं पहिलं लग्न झालं. मोठ्या

कौतुकानं कनकाईनं सून घरीं आणली. पण थोडक्याच दिवसांत कळलं, कीं तिला दम्याचा विकार आहे! एकदां धाप लागली, कीं अगदीं जीव जायची पाळी!

कनकाई बोल्होबांना म्हणाली,

“आतां कसं करायचं?”

“काय झालं?”

“ही दमेकरी पोर तुक्याचा प्रपंच कसा पार पाडील?”

“मग काय करत्येस?”

“दुसरं काय! आणखी एक सून आणा.”

“अन् ही?”

“तीहि राहील, हीहि राहील. घरीं एवढा वाढता बारदाना. धडधाकट कर्ती-सवर्ती पोर नको घरांत?”

अन् मग पुनः शोधाशोधी सुरू झाली. पुण्याला आप्पाजी गुळवे नांवाचे मोठे श्रीमंत सावकार. त्यांच्याशीं बोलणं झालं. त्यांनीं जांवई पाहिला. आवडला त्यांना. लग्न ठरलं. देहूहून गाड्या भरभरून वऱ्हाड गेलं पुण्याला. नवरा बिचारा एवढासा. वऱ्हाडयांचाच थाट अधिक.

**नवरियाच्या संगें वऱ्हाड्यांचा सोहळा ।**
**मांडे, पुरणपोळ्या; मिळे अन्न ॥**

लग्न मोठ्या कडाक्यानं झालं. आप्पाजी गुळव्यांची लेक आवली जिजाबाई तुकाराम मोरे होऊन मुंडावळ्या बाजूला सारीत लाजत लाजत देहूच्या घरांत आली.

आतां कनकाईचा काय थाट! थोरल्या लेकाचं—सावजीचं लग्न अगोदरच झालं होतं. त्याची बायको, तुकारामाच्या दोन बायका अशा तिघी तिघी सुना! धाकट्या कान्होबाचं लग्न अजून व्हायचंच होतं.

बोल्होबांना वाटलं, आतां पुरे झालं. पोरांच्या अंगावर प्रपंच टाकावा. आपण हरिहरि करीत वारीकडे लक्ष द्यावं. त्यांनीं सावजीला बोलावून सांगितलं,

"सावबा, आतां आम्हांला करा कीं मोकळं!"

"कशांतून?"

"प्रपंचाच्या व्यापांतून!"

सावजीचं ध्यान तिसरीकडेच लागलं होतं. प्रपंचांत त्याचं लक्ष नव्हतं. निरनिराळ्या क्षेत्रांतून अन् तीर्थांतून वारकरी यायचे. ते त्या तीर्थक्षेत्रांच्या गमती सांगायचे. सावजीला वाटे, काशीला जावं, बद्री-नाथला जावं, अन् गंगोत्री पाहावी.

तो हळूच म्हणाला,

"बाबा, मला नाहीं हें जुळायचं!"

"मग काय जुळेल तुला?"

"मी तीर्थयात्रा करायला जाणार आहें!"

बोल्होबांना आश्चर्य वाटलं. या वयांत तीर्थयात्रा? ते म्हणाले,

"सावबा, तुला झालंय् काय? कुणी भांडलं का तुझ्याशीं?"

"नाहीं!"

"मग असा एवढ्याशा वयांत जोग कां घेतलास?"

नानापरींनीं समजावलं सावजीला. पण तो कांहीं ऐकेना. शेवटीं कंटाळून त्राग्यानं बोल्होबांनीं तुकारामाला बोलावलं. ते म्हणाले,

"तुका, अरे सावजी बघ काय म्हणतोय्!"

"काय?"

"म्हणतोय्, मला तीर्थयात्रेला जायचं!"

"होय दादा?"

"हो."

"तुका, बाबांनो, तुम्ही असं करायला लागलांत तर प्रपंच कुणी रे सांभाळायचा ?"

तुकारामानं क्षणभर विचार केला. मग तो दादाच्या जवळ गेला. त्याला नमस्कार करून म्हणाला,

"दादा, तूं राम. मी लक्ष्मण. सांग मी काय करूं ?"

सावजी गहिंवरून बोलला,

"तुका, मी तर जाणार. पण माझ्या मागं प्रपंच तूं सांभाळ. बाबांना मोकळं कर."

"ठीक आहे. बाबा, मी तयार आहें. काय करूं तें सांगा."

बोल्होबांना बरं वाटलं. त्यांनीं तुकारामाला एकेक समजावून दिलं. कीर्द कशी लिहायची, खतावणी कशी मांडायची, नफातोटा कसा काढायचा, मिळवणी कशी करायची, माल आणायचा कसा, विकायचा कसा, हें सगळं त्यांनीं तुकोबाला शिकवलं.

दुसऱ्या दिवसापासून तुकोबा दुकानावर बसायला लागला. बोल्होबाचे देणेकरी येत. त्यांना ते सांगत,

"आतां माझ्याकडे कांहीं राहिलं नाहीं. तुकाराम अन् तुम्ही."

"पण–"

"अगदीं काळजी करूं नका. तो तुम्हांला फसवायचा नाहीं."

खरोखरीच तुकारामानं कुणाला फसवलं नाहीं. हिशेब अगदीं चोख. पै इकडची तिकडे व्हायची नाहीं.

गिऱ्हाइकं यायचीं. देणेदार यायचे, व्यापारी यायचे. ते म्हणायचे,

"एवढासा तुकाराम. हा काय दुकान चालवणार ?"

पण तुकोबानं त्या अवघ्यांना तोंडांत बोट घालायला लावलं. माल घ्यायचा. आणणावळ अन् थोडासा नफा घेऊन विकून टाकायचा. मुद्दलांत खोट येऊं द्यायची नाहीं.

मुदलामधें पडे तोटा। ऐसा खोटा उदीम ॥

केव्हां काय आणलं तर खपतं, हें तुकोबानं बरोबर हेरलं. धान्य पाहिजे तेव्हां धान्य, किराणा पाहिजे तेव्हां किराणा. हिशेबहि अगदीं चोख ठेवायचा. पैहि इकडे तिकडे होतां उपयोगाची नाहीं. एखादे दिवशीं हिशेबांत कांहीं गडबड असली, तर तुकोबानं रात्ररात्र त्या चुकीच्या शोधासाठीं समई जाळीत बसावं. अवलीनं फुरगटून म्हणावं,

"आतां झोपा कीं।"

"नाहीं आवले! हिशेबांत चूक राहतां कामाची नाहीं."

"तेल जळतंय् तें?"

"जळूं दे. ताळा जमला पाहिजे."

चुकलीया ताळा। वाती घालुनि बैसे डोळा ॥

अन् नुसताच व्यवहार चालला होता का? नाहीं नाहीं! व्यवहार चोख, तसाच खर्चहि सुरू. कशांत खर्च करावयाचा तो पैका?.

गोरगरिबांना मदत करण्यांत. आडरानांत पाणपोई घालण्यांत. ज्याला कुणी वाली नाहीं, त्याला वाली तुकाराम! त्यांनीं एक अभंग केला. तो त्यांच्याच प्रपंचाची कथा आहे म्हणा ना!

जोडोनियां धन उत्तम वेव्हारें।
उदास विचारें वेंच करी ॥
उत्तमचि गति तो एक पावेल।
उत्तम भोगील जीवखाणी ॥
परउपकारी नेणे परनिंदा।
परस्त्रिया सदा बहिणी माता ॥
भूतदया गाई पशूंचें पालन।
तान्हेल्या जीवन वनामाजीं ॥

जोडीला हरिनामस्मरण आहेच. वारीचा वांटा बोल्होबा उचलीत. पण देहूच्या रावळाची व्यवस्था तर तुकारामालाच पाहावी लागे. तें देऊळ दोनतीनशें वर्षांपूर्वीं बांधलेलं. कांहीं भाग पडायला झाला होता त्याचा. त्याची डागडुजी, झाडलोट, दिवाबत्ती, आल्यागेल्या वारकऱ्यांची दुपारची सोय, हें सगळं तुकोबाकडे.

शिवाय चातुर्मासांत एखादा ग्रंथ वाचणं सुरू करायचं. नेहमींची नित्यसेवा आहेच. नित्यसेवा म्हणजे भजन, कीर्तन हें सगळं.

असा देखणा प्रपंच चालवला तुकोबानं. वडील अन् आई दोघंहि आनंदांत. पैपाहुण्यानं यावं. दुकान नीट चाललेलं पाहावं. अन् बोल्होबांना म्हणावं,

"तुकारामानं तुमचं नांव चालवलं बरं का!"

बोल्होबांनीं कौतुकानं सांगावं,

"चालवायचाच! विश्वंभरबाबांचं रक्त आहे तें!"

आयाबायांनीं यावं. कनकाईला म्हणावं,

"कनकाबाई, तुझी कूस धन्य झाली!"

"कशानं ग बाई?"

"कशानं काय? सगळा गांव नांवाजतोय् तुकारामाला!"

"काय काय म्हणतो गांव?"

"दुसरं काय म्हणायचा? जें गिऱ्हाईक धांवतं, तें तुकारामाच्या दुकानांत! सगळीं म्हणतात, इथं कांहीं आपली फसवणूक व्हायची नाहीं!"

"हो ना! अन् लेकरूं तुझं दयाळू किती? गाई, गुरं, कोणी कोणी म्हणून त्याच्यादेखत उपाशीं राहायचं नाहीं."

मग कनकाईला अगदीं धन्य धन्य व्हावं. तिनं संध्याकाळीं तुकारामाला म्हणावं,

" तुका, इकडं ये बाबा ! "

" काय आई ? "

" कांहीं नाहीं ! तुझी दृष्ट काढत्यें ! "

" मला काय झालंय् ! "

" तुला कांहीं झालं नाहीं. पण माझ्या मनाची कल्पना फिट्टं दे. आण ग सूनबाई मीठमोहोरी ! "

मग गालांतल्या गालांत हसत अवलीनं–जिजाबाईनं मीठमोहोरी आणावी, अन् कनकाईनं तुकोबाची दृष्ट काढावी !

* * *

## ५. पहिला घाव

पण सुखाचा संसार एकसारखा टिकत नाहीं. कधीं सुख तर कधीं दुःख. कधीं हंसणं तर कधीं रडणं. एक जन्मतो, तर दुसरा मरतो. म्हणून तर याला संसार म्हणावयाचा. संसार म्हणजे सरणारा, चालणारा. एक्या जागीं थांबायचा नाहीं.

बोल्होबा म्हातारे होईतोंवर त्यांनीं वारी नियमानं केली. पण पुढं त्यांच्यानं होईना झालं. त्यांतच सावजीची बायको एकदम आजारी पडली !

तुकारामावर घराचा भार. सावजी कांहींच पाहायचा नाहीं. तुकारामानं धांवपळ करून वैद्य आणले. कनकाईनं देवाला आण घातली. पण उपयोग कांहीं झाला नाहीं. एका दिवशीं सावजीच्या मांडीवर डोकं ठेवून सावजीच्या बायकोनं राम म्हटलं !

तो धक्का कांहीं बोल्होबांना सहन झाला नाहीं. वारीचा भार तुकोबाच्या गळ्यांत टाकून एका पहाटेला त्यांनींहि डोळे मिटले !

केवढं दुःख! थोरली भावजय गेली! पाठोपाठ वडील गेले. छत्र गेलं! आतां कुणाच्या सावलींत आसरा घ्यायचा! कनकाईचं समाधान करायचं, का कान्होबाला समजावायचं!

सावजी तर विरक्तच झाला. जेवेना, खाईना. तुकोबानं म्हणावं,

"दादा, असं रे काय करतोस?"

"कसं?"

"जेवत नाहींस, बोलत नाहींस, बरं म्हणत नाहींस, वाईट म्हणत नाहींस—"

सावजीनं तुकोबाच्या डोईवर हात ठेवावा, अन् म्हणावं,

"तुका, माझं कशांत लक्ष लागत नाहीं रे!"

"काय वाटतं तुला?"

"मला घर सोडून जावंसं वाटतं!"

"दादा, ऐक माझं. आत्तांच नको जाऊंस. आईला अपरंपार खेद होईल!"

"होऊं दे. तूं सांभाळ तिला. आतां मागं पाश राहिला नाहीं—"

"कां नाहीं? मी, कान्हा—"

"तुम्हांला सांभाळील पांडुरंग!"

अन् दुसऱ्या दिवशीं पहाटे उठून पाहतात, तों सावजी नाहीं! उडाला पक्षी!

घरीं नुसता आकान्त झाला. कनकाईनं, कान्होबानं कोल्हाळ मांडला. आतां तुकोबानं करायचं तरी काय काय! घर सांभाळायचं कीं दुकानाकडे पाहायचं, कीं शेताकडे खेप टाकायची, कीं वारी पुढं चालवायची, कीं राउळाची व्यवस्था बघायची!

संकटं एकेकटीं कधीं येत नाहींत. झुंडीनं येतात तीं.

कसाबसा तुकोबानं प्रपंच रेटला, तर आणखी एक संकट. एका माणसाला कर्जाऊ रक्कम दिली होती. तो मेला. दुसरा गांव सोडून परागंदा झाला. तिसऱ्यानं खाका वर केल्या!

झालं! दुकानाचा जम मोडायला लागला. गांवांत चार भले होते. ते येऊन बसले दुकानच्या फळीवर. तुकोबाला सांगायला लागले,

"तुका! बाबा, आमचं ऐक आतां."

"काय करूं?"

"ती पंढरीची वारी अन् भजन कीर्तन सोडून दे. घर धडपणीं चालायला लागलं, तर वारी पुन्हा सुरू करतां येईल.

थोडा वेळ विचार करून तुकोबानं सांगावं,

"हें व्हायचं नाहीं माझ्या हातून."

"काय व्हायचं नाहीं?"

"वारी सोडणं."

"कां?"

"कां म्हणून विचारतां? ऐका. गेल्या आठदहा पिढ्या माझ्या वंशांत पंढरीची वारी चालली आहे. चांगल्या दिवसांत पंढरी करायची अन् वाईट दिवस आले कीं घर धरून बसायचं, असं शिकवलं नाहीं मला कुणीं! माझ्या वाडवडिलांनींहि नाहीं. दिवस काय, काल चांगले होते. आज वाईट आहेत. उद्यां कदाचित् पुनः चांगले होतील. पण वाईट दिवस आले, म्हणून मी कुळधर्म सोडायचा नाहीं."

"पाहा बरं! मग सांगितलं नाहीं म्हणशील!"

"मुळींच नाहीं म्हणायचा."

"इच्छा तुझी!"

भलीं माणसं उठून वाटेला लागलीं. त्यांच्यांत चर्चा सुरू झाली.

"काय उर्मट पोर आहे !"

"आमचं ऐकत नाहीं !"

"खुशाल उत्तरं देतो !"

"गांवांत नांदायचंय् म्हणावं !"

"ठीक आहे. आतां चालव म्हणावं दुकान! कसं गिऱ्हाईक येतंय् तुझ्याकडे, तें पाहातों आम्ही."

दुसऱ्या दिवसापासून कुणा गिऱ्हाइकाला फिरकूं देईनात गांवकरी मंडळी! तुकारामानं सकाळपासून दुकान उघडून बसावं. पण संध्याकाळपर्यंत पैचा माल खपूं नये. रात्रीं आवलीनं विचारावं,

"किती आला गल्ला?"

"पैसुद्धां नाहीं."

"कां हो? भांडणबिंडण झालं कीं काय गांवकऱ्यांशीं?"

मग तुकारामानं झालेला प्रकार सांगावा. तो ऐकून आवली म्हणायची,

"खरं आहे गांवकऱ्यांचं."

"काय खरं आहे?"

"पांडुरंग सगळीकडे आहे. पंढरीला आहे, अन् इथं नाहीं वाटतं? इथूनच नमस्कार करावा त्याला. व्यापार बुडवून पंढरीला कशाला जायचं?"

"तुला कळत नाहीं, आवले. पूर्वजांनीं घालून दिलेला नेम का मोडूं मी?"

"नेम नेम! बसा नेम घेऊन. नेमानं का पोट भरतंय्?"

मग तुकारामानं कांहींच बोलूं नये.

एवढ्यानंच भागलं नाहीं. गांवकरी पुंड देणेदारांचीं देणीं परत येऊं देईनात. तुकारामानं हटकून विचारावं,

"काय नारबा? अरे, पैका नेला होतास तो आणून दिला नाहींस!"

" कसा आणून देऊं ? "

" म्हणजे ? "

" म्हटलं गांवांत राहायचंय् मला. तुझ्यासारख्या पंढरीच्या वाऱ्या करायच्या नाहींत ! "

" पंढरीच्या वारीचा अन् माझ्या देण्याचा काय संबंध ? "

" ऐका ! अरे बाबा, तुझं देणं दिलं, तर गांवकरी गांवांतून हांकून देतील मला; समजलास ! तुझं ठीक आहे बाबा ! आमच्या घरीं कांहीं बापाशेटीची पेंड नाहीं ! "

हें असं व्हायला लागलं ! तुकारामानं विचार केला, देव माझी परीक्षा पाहातोय्. पाहूं दे.

पुढं आली कार्तिकी वारी. तुकारामानं कनकाईला म्हटलं,

" आई, वारी आली. जाऊं ना ? "

" जा ना बाबा ! वारी चुकवून कसं चालेल ? "

शेतांत उभा होता जोंधळा. तुकारामानं आवलीला त्याच्याकडे लक्ष ठेवायला सांगितलं, अन् आपण पंढरीला गेला. मागं गांवच्या पुंडांनीं त्या उभ्या पिकांत गुरं घातलीं ! एक कणीस कांहीं ठेवलं नाहीं !

तुकाराम परत आला, तों आवलीनं केली छाती बडवायला सुरुवात.

" मेल्यांनीं माझ्या पिकाचं वाटोळं केलं ! नांवं सांगत्यें तुम्हांला. एकेकाची सटक काढा ! "

तुकारामानं क्षणभर डोळे मिटले, अन् म्हणाला,

" आवले, सटक काढून तुझं शेत पुनः कणसांनीं भरणार आहे का ? "

" मग कांहीं करायचं नाहीं तुम्हांला, असं म्हणा कीं ! "

" पाहिजे तर तसं समज ! श्रीहरीची इच्छा ! "

" कर्म ग ऽ ऽ बाई. अहो, तुमचा श्रीहरी काय खायला देतोय् आणून ! "

एवढ्यानं छळवाद पुरा झाला नाहीं. व्यापार म्हटला कीं कांहीं देणं, कांहीं घेणं चालायचंच. तुकारामानं ज्यांच्याकडून पतीवर माल आणला होता, त्यांच्याकडे गांवचे पुंड गेले.

" अहो, तुमच्या मालाचे पैसे बुडाले ! "

" काय झालं ? "

" काय व्हायचंय ! देहूच्या तुक्या वाण्याचं दुकान पार बसलं ! पैचा विक्रा कांहीं होत नाहीं ! "

" म्हणतां काय ? "

" खोटं का सांगतोय् तुम्हांला ? जाऊन बघा ! "

सावकारांचीं माणसं आलीं पाहतात, तों दुकानांत एक गिऱ्हाईक नाहीं. गल्ल्यांत एक पै नाहीं. तुकाराम आपला देवाचं भजन करींत बसला आहे ! त्यांनीं केली हातघाई.

" तुकोबा, आमचा पैका द्या, नाहींतर सामान बाहेर काढतों ! "

तुकारामानं त्यांना खूप समजावलं.

" तुमची पै कांहीं मी बुडवायचा नाहीं. सगळं देणं देऊन टाकीन. पुढली सुगी होऊं द्या. "

" सुगीबिगी नाहीं माहीत आम्हांला. आमचा पैका पाहिजे, अन् तो आत्तां पाहिजे ! "

मोठा कठीण प्रसंग ! तुकारामानं त्यांना दुकानांत बसवलं, अन् आपण गांवकऱ्यांकडे निघाला. त्यांना विनवलंन् त्यानं.

" मी माणूस कसा तो तुम्हांला माहीत आहे. आजपर्यंत कुणाची पै कांहीं बुडविली नाहीं. थोडं थोडं करून पै न् पै देऊन टाकीन. आज एवढं काम करा. "

गांवकऱ्यांनीं डोळे मिचकावीत म्हटलं,

" आमच्याजवळ कुठला पैका बाबा ? तुझा पंढरिनाथ सगळ्या जगाचा मालक आहे ना ? त्याला म्हणावं, दे आतां पैका ! "

" त्या वेळीं सांगत होतों, तर ऐकलं नाहीं. आतां भोगा त्याचीं फळं ! "

" माजोरीपणा केला, म्हणजे असंच होतं ! "

" म्हाताऱ्या माणसांचं ऐकलं नाहीं, कीं अशीच ठेच लागते ! "

खिन्न होऊन तुकाराम परतला. त्याचं उतरलेलं तोंड पाहिलं, तशी सावकाराच्या माणसांनीं काढलं सामान बाहेर ! गांवभर आरडा झाला.

" तुक्या वाण्याचं दिवाळं निघालं ! "

कनकाई अन् आवलीनं हें ऐकलं. तशा त्या दोघी धांवल्या दुकानाकडे. तुकाराम एका बाजूला स्वस्थ बसला होता ! डोळे मिटलेले होते ! अन् मुखानं चाललं होतं श्रीहरीचं नामस्मरण !

आवली अप्पा गुळव्याची लेक. सुखांत, लाडांत वाढलेली. असा अपमान तिला कधीं ठाऊक नाहीं. त्यामुळं ती भडकली. तुकारामाजवळ जाऊन म्हणाली,

" अहो ! डोळे झांकून काय बसलांय् ? या माल उपसणारांच्या कमरेंत एकेक लाथ घाला ! "

तुकारामानं डोळे उघडले. तो म्हणाला,

" असं बोलूं नये, आवले ! "

" बोलूं नये ? गांव काय आरडतोय् ऐकलंत का ! "

" काय ? "

" सगळे म्हणतात, कीं तुका वाण्याचं दिवाळं निघालं ! "

" खरं म्हणतो गांव. "

" खरं म्हणतो ? अहो, मग तुम्ही या लोकांना हांकून कां देत नाहीं ? तुम्हांला कांहींच कसं नाहीं ? "

" त्याचं असं आहे आवले, यांचे पैसे आहेत आपल्याकडे. आपल्याला ते देतां येत नाहींत— "

" कां देतां येत नाहींत ? "

" कुठून द्यायचे ? दुकानाची दशा तर ठावकीच आहे तुला ! "

" तुम्हांला देतां येत नाहींत ना ? मी देत्यें. "

" तूं कुठून देत्येस ? "

" माझ्या बापाकडून आणून देत्यें. "

सामान काढणारांनीं हें ऐकलं. गुळवे सावकार त्यांच्या ओळखीचे. त्यांना वाटलं, कीं गुळवे सावकाराचा हवाला घेतला तर चालेल. ते थांबले.

पण पुंडांना कसं बरं वाटणार ? त्यांतला एक त्यांच्या कानाशीं लागला,

" अहो, तुम्ही बाईमाणसावर काय विश्वास ठेवतां ? "

पटलं हें त्या लोकांना. पुनः सामान काढायला लागले ते. आवलीनं कपाळावर हात दिला अन् म्हणाली,

" अहो सन्तमहन्त ! झालं ना आतां वाटोळं ! "

" माझं ? माझं नाहीं झालं. "

" मग कुणाचं ? "

" श्रीहरीचं. दिवाळं निघाल्यानं त्याचं वाटोळं झालं. "

**निघालें दिवाळें । झालें देवाचें वाटोळें ॥**

" कर्म ग ऽ बाई ! आतां आमच्या पोटांत काय घालाल ! "

" अधीर होऊं नकोस, आवले. पैका, मान, हें सगळं प्रारब्धांत लिहिलं असलं, तर पुनः मिळेल. आपण प्रयत्न करीत असावं. मीं प्रयत्न केला, यश मिळालं नाहीं. मग आतां रडून दुःख कमी का होणार आहे ? बघ बरं ! मी कुठं रडतों आहें ? "

**प्रारब्धेंचि जोडे धन । प्रारब्धेंचि वाढे मान ॥**
**प्रारब्धेंचिं भरे पोट । तुका करीना बोभाट ॥**

कनकाईचं तर ठीकच होतं. आवलीला मात्र फार खेद झाला. कुणी तोंड काढूं देईना बाहेर. जरा कुठं पाण्याबिण्याला बाहेर पडलं, कीं आया बाया बोटं दाखवून म्हणायच्या,

" ती पाहिलीस का ग ? "

" काय झालं ? "

" तुला नाहीं का माहीत ? तिच्या नवऱ्याचं दिवाळं निघालं ! "

" असं का ? "

अन् मग सगळ्याजणी खदाखदा हसायच्या !

तुकारामानं दिवाळं निघाल्यापान देऊळ धरलंन्, तें कांहीं सोडीना तो. घरीं ज्ञानेश्वरी होती. नामदेवाची गाथा होती. त्यांचं वाचन करावं. झोपावंहि देवळांतच.

आवली कनकाईला म्हणाली,

" सासूबाई, मला मेणा पाहून द्या. "

" कशाला ग ? "

" मी माहेरीं जात्यें."

कनकाईच्या पोटांत उभा राह्यला गोळा. तिनं आवलीला जवळ घेतलंन् अन् समजावीत म्हणाली,

" बाई माझे ! राग धरूं नकोस बरं त्याचा ! फार गुणांचा मुलगा आहे माझा तो."

आवलीला खुदकन् हसूं आलं. डोळे पुशीत ती म्हणाली,

" सासूबाई, मी रागावून नाहीं जात."

" मग ? "

" पैशांची सोय पाह्यला जात्यें."

" कुठं ? "

" माझ्या बापाकडे."

"नको पोरी. तुझ्या बापाचा पैका पुरे पडायचा नाहीं आपल्याला."

"तसा आणीत नाहीं. कागद करून देईन. मग तर झालं?"

"कागद करून देशील?"

"हो! मला सगळं येतं! बोल्होबा सावकारांची सून आहें मी!"

"जा, पोरी जा! आशीर्वाद देत्यें तुला!"

आवली गेली, अन् आपल्या नांवाची खतचिठ्ठी करून देऊन बापाकडून दोनशें रुपये घेऊन आली. त्या वेळचे दोनशें रुपये. जेव्हां दूध दोन पैसे शेर, अन् म्हशीचं तूप साडेतीन आणे शेर होतं, तेव्हांचे.

कनकाईनं तुकोबाला समजावून आणलंन्. आवली म्हणाली,

"आतां इथं दुकान घालायचं नाहीं."

"मग काय करायचं?"

"देशावरून माल घेऊन कोंकणांत जायचं."

"ठीक आहे."

मिरच्या घेतल्या. गोणी भरल्या. बैलांवर घातल्या. तुकोबा निघाले कोंकणांत. मुखानं हरिनामाचा गजर. तिथं बाजारांत मिरच्या घेऊन वसले. पण लक्ष लागलेलं देवाकडे. एका लबाडानं हेरलंन् हें. तो तुकोबांच्याजवळ आला. म्हणाला,

"बुवा, पैसे नाहीं आणले मीं. पण मिरच्या फार छान आहेत. पंधरावीस शेर घेईन म्हणतों. मणभरसुद्धां घेईन. पैसे मागून आणून दिले तर चालतील का?"

"द्याल ना आणून?"

"वा वा! तुमच्यासारख्या साधु माणसाशीं का खोटं बोलणार आहें मी?"

" घ्या तर मग. "

" माप बरोबर करा बरं का ! "

" मी कमी कसा देईन ? "

" नाहीं, आपलं उगीच म्हटलं ! "

मणभर मिरच्या त्या लबाडानं घेतल्या पदरांत. त्याचं पाहून दुसरा लबाड आला. त्यानं दोन मण घेतल्या. मग कुणी शेर, कुणी दोन शेर, कुणी चार शेर ! शेवटीं तर तुकोबांना कुणी विचारीच ना ! जो तो मिरच्या घेऊन पळायला लागला ! कुणीं पैसे दिले; कुणीं नाहीं दिले. कुणीं साफ फसवलं ! तुकोबांनीं पैसे मागून पाहिले. पण लबाड म्हणायला लागले,

" कुणीं घेतल्या तुझ्या मिरच्या ! वा रे वा ! चांगला माळकरी दिसतो आहेस कीं ! "

" तर काय ! अरे, कमींत कमी खरं तरी बोलत जा ! "

शेवटीं जेवढे पैसे मिळाले, तेवढेच घेऊन तुकोबा देहूला परतले ! सगळं ऐकून घेतलंन् आवलीनं, अन् जी कडाडली आहे !

" माझं नशीबच खोटं ! म्हणून तुम्हांला अशी बुद्धि झाली ! माझ्या नशिबीं आतां सुखच लिहिलं नाहीं ! "

एक नी दोन !

पुन: तिनं तुकोबांना बाहेर काढलंन्. या पाळीला भरल्या मिठाच्या गोणी. आवली म्हणाली,

" आतां घाटावर जा कुठं तरी. कोंकणांत जाऊं नका. "

" कां ? "

" कोंकणचीं माणसं लबाड असतात. "

" अन् घाटावरचीं ? सगळीकडलीं माणसं सारखींच, आवले. पळसाला पानं तीनच ! "

" बरं बरं ! या पाळीला कुणाला उधार देऊं नका. "

" नाहीं द्यायचा. "

तुकोबा मिठाच्या गोण्या घेऊन घाटावर गेले. मीठ विकलं. बरा फायदाहि झाला. परतले तुकोबा. एका गांवीं मुक्कामाला राहिले, मारुतीच्या देवळांत. तिथं भजन सुरू केलं. भजन ऐकायला चारसहा माणसं येऊन बसलीं. भजन आटोपलं, अन् एका म्हाताऱ्यानं पाय धरले बुवांचे.

" बुवा, मला घेऊन चला तुमच्याबरोबर ! "

" कां बाबा ? "

" माझ्या लेंकराबाळांचे कष्ट नाहीं पाहावत माझ्याच्यानं ! "

" काय झालं तुमच्या लेंकरांना ? "

" काय सांगूं ? थोरला लेक होता. तो लढाईंत मेला. मागं बायको अन् पोरं ठेवून गेला ! "

" अरेरे ! "

" लेक दिली होती शेजारच्या गांवीं. तिच्या नवऱ्याला दरोडेखोरांनीं मारलं ! ती परत आली — दोन पोरांना घेऊन ! "

" वाईट झालं ! मग आतां ? "

" शेती होती थोडकीशी, ती सावकारानं घेतली ! या पोरांच्या पोटाला काय घालूं ? "

" दुसरा कांहीं उद्योग नाहीं का तुम्हांला ? "

" उद्योग ? लेक अन् सून लोकांच्या शेतांत खुरपायला गेल्या तर टारगट पोरं त्रास देतात ! त्या घरीं येऊन म्हणाल्या, कीं आम्हांला अफू आणून द्या ! "

" सावकाराचे किती पैसे होते ? "

" पन्नास रुपये. "

" त्याला पैसे परत दिले, तर तो शेत सोडील का ? "

" हसत सोडील ! "

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

तुकोबांनीं थोडा वेळ विचार केला. मग म्हणाले,

“बाबा, तुम्ही शेत परत घ्या.”

“पैसे ?”

“मी देतों ! मात्र कुणाला सांगूं नका.”

म्हातारा तुकोबांच्यां पायांवर डोकं ठेवून रडायला लागला. बाबांनीं त्याला उठवलं. रुपये मोजून दिले. ते पदरांत बांधून म्हातारा बोलला,

“सकाळीं आमच्या घरीं यायचं, न्याहारी करायची, अन् मग पुढं चलायचं बरं का !”

पण तुकोबा कशाला थांबताहेत तिथं ! शुक्र आकाशांत उगवला. तुकोबा उठले, बैल सोडले, अन् भूपाळ्या म्हणत चालते झाले !

घरीं आल्यावर आवलीला समजावतां समजावतां पुरे वाट झाली ! तिनं अगदीं फाडून खाल्लंन् तुकोबांना.

* * *

## ६. दुष्काळ

पुढल्या वर्षी आषाढ कोरडा गेला. श्रावण उजाडला. आकाशांत कुठं ढगाचा लहानसां तुकडाहि दिसेना ! कधीं कुठं एखादा ढग डोकावून जाई. पण पांढरा फिटुक ! पाण्याचा थेंबहि नाहीं त्याच्यांत.

भाद्रपद, आश्विन अन् कार्तिक. सगळे कोरडे. शेतजमीन लहालहा करत्येय् पाण्यावांचून. पाऊसच नाहीं. कसलं कर्माचं पिकतंय् ! चहूंकडं मृगजळांचे वाफारे धांवताहेत.

शेतांना भल्या थोरल्या भळी पडल्या. गुरांचीं पोटं पार खपाटीला गेलीं. झाडझुडूप, पार ओरबाडून खाल्लं त्यांनीं. कुठं रानांत एका झाडालाहि पान दिसेना.

विहिरी कोरड्या ठणठणीत पडल्या. बावी आटल्या. तळीं सुकलीं. ओढे वाळून गेले. एवढी इन्द्रायणी गंगामाई, पण तिलाहि खंड पडला. डोहांतून कुठं कुठं पाणी दिसतंय्. पण तें सांठलेलं. गुरं त्यांतच पाणी प्यायचीं. त्यांतच हगायचीं. त्यांतच मुतायचीं. माणसं प्यायला पाणी त्यांतलंच न्यायचीं.

त्या पाण्याला घाण यायला लागली. किडे पडले त्याच्यांत. तें पिऊन रोगराई सुरू झाली. एकादशीच्या घरीं शिवरात्र, त्यांतला मामला. अगोदरच खायला मिळेना. त्यांत पटकीचा कहार. मग काय ! गांवंच्या गांवं ओस पडायला लागलीं.

अन् तुकोबा ?

ते तरी काय करणार ! चौघांची गत ती त्यांची गत !

घरांतलं धान्य संपलं. कणग्या मोकळ्या झाल्या. उंदीर खुशाल दिवसाढवळ्या हिंडायला लागले. झोंपलेल्या माणसांचे अंगठे खायला लागले. कनकाई आजारी पडली. पहिल्या बायकोचा दमा बळावला.

जिजाई तुकोबांना शोधीत देवळांत आली. तिथं तुकोबा ज्ञानेश्वरी वाचीत बसले होते. जिजाबाईच्या तळपायांची आग मस्तकाला गेली. तुकोबांच्या समोरची ज्ञानेश्वरी हिसकलीन् तिनं, अन् म्हणाली,

"अहो ! तुम्ही एवढे कसे निःसंग झालांत ?"

"काय झालं, आवले ?"

"काय व्हायचं राहिलंय् ? घरांत अन्नाचा दाणा नाहीं !"

"मग मी काय करूं आतां ?"

"मागं पुष्कळ कुळं आमच्या घरावर जगलीं ! त्यांच्याकडे किती तरी येणं राह्यलंय्. जा त्यांच्या घरीं. द्या म्हणावं, आतां तरी द्या !"

"तीं कुळं तरी कुठून देतील, आवले ? त्यांच्याहि घरीं आपल्या-सारखीच परी !"

"काय वाटेल तें करा म्हणावं—"

"असं कसं म्हणतां येईल ? त्यांची दशा डोळ्यांना दिसत्येय्—"

"अन् आमची ? आमच्याच वेळीं कां डोळे झांकून बसतां ?"

"मग काय करूं आतां ?"

"काय वाटेल तें करा ! चोरी करा ! दरोडा घाल ! घरांत धान्य आणा म्हणजे झालं !"

"आवले !"

आवलीचे डोळे घळघळायला गले ती हुंदके देत म्हणाली,

"काय करूं हो ! तुमचं माझं मेलं होईल कसंहि. पण बाईचा दमा ! धाप लागली म्हणजे अगदीं पाहावत नाहीं त्यांच्याकडे ! कांहीं पथ्य आहे, का पाणी आहे !"

"आवले, आतां तिला पथ्य एकच !"

"कोणतं ? सांगा तरी !"

"श्रीहरीचं नाम !"

**पथ्य नाम विठोबाचें । आणिक न वाचे न सेवीं ॥**

आवलीनं ओठ चावला. ती म्हणाली,

"अन् सासूबाईंना ?"

"तिलाहि तेंच ! मन काढ म्हणावं प्रपंचांतून. हरीकडे लाव आतां. पुष्कळ दिवस प्रपंच केला. आतां म्हातारपणीं देवाचं नांव घे म्हणावं."

"मी नाहीं सांगत. तुम्हीच सांगा !"

तुकोबा उठले. आईकडे गेले.

"आई !"

"काय तुका !"

"कसं वाटतंय् ग आतां?"

"आतां काय वाटायचंय् बाळा! परलोक दिसायला लागला मला!"

"तर मग आतां संसारांतून मन काढून हरीकडे लाव, आई."

"तेंच करत्यें रे बाळा! पण—"

"पण काय आई?"

"सूनबाई! तिचं अगदीं बघवत नाहीं!"

तुकोबांचेहि डोळे पाणावले. ते म्हणाले,

"मी तरी काय करूं, आई? भल्याभल्यांची अशीच गत झाली आहे! आपण कोंणा झाडाचा पाला!"

"खरं रे बाळ! एक करशील?"

"काय?"

"हो म्हण. मग सांगत्यें."

"हो."

"तर मग थोडा वेळ तिच्याजवळ बसत जा!"

तुकोबा उठले. थोरल्या बायकोकडे गेले. ती एका कोपऱ्यांत झोंपली होती. खालीं अंथरली होती एक वाकळ. तिच्यावर ती पडली होती—हातपाय पोटाशीं घेऊन. हाडांचा सांपळा. श्वास जोरानं चाललाय्. डोळे तेवढे वर आलेत. तुकोबांनीं तिला पाहिलं. त्यांना फार वाईट वाटलं. ते खालीं बसले. तिच्या पाठीवर हात ठेवला त्यांनीं.

"कोण आहे?"

"मी आहें, तुका!"

तिनं तोंड उचलून पाह्यलंन्. तिचा भ्रतार तिच्या अगदीं जवळ बसला होता—देवमाणूस. ती पटकन् उठून बसली. धांपा टाकीत म्हणाली,

"पाय द्या हिकडं!"

" कशाला ? "

" द्या तुम्ही ! "

तिनं तुकोबांचे पाय दोन्ही हातांनीं धरले. त्यांच्यावर डोकं ठेवलं. म्हणाली,

" आतां कसं बरं वाटतंय् ! एक वचन द्याल का ? "

" काय ? "

" अगोदर द्या. मग सांगतें."

" सांग. दिलं वचन ! "

" तर मग मी मरेन तेव्हां माझ्याजवळ असा ! मला असंच तुमच्या पायांवर डोकं ठेवून मरण येऊं द्या ! "

तुकोबांनीं डोळे पुसले, अन् मान हलवली.

पण गेला दिवस बरा म्हणायची पाळी आली. एवढे दिवस निघाले कसे तरी. पण आतां मात्र काळ कठीण आला. चोरूनमारून पैका ठेवला होता आवलीनं. त्याचं धान्य आणून खाल्लं. अंगावर चार सोन्याचे डाग होते. ते संपले. कळणाकोंड्यावर पोरं कशींबशीं जगत होतीं. पण आतां कळणाहि नाहीं, अन् कोंडाहि नाहीं !

थोरलं पोर म्हणे,

" आई, भूक लागली ! "

आवली संतापून म्हणे,

" मेल्या, मला खा आतां शिजवून ! "

धाकटं पोर दिवसभर आवलीला प्यायला पाही, पण खाणच नाहीं तिला. दूध कोठून येणार अंगावर !

अन् एका दिवशीं कनकाईनं डोळे मिटले. घराचा आसरा तुटला. मोठं माणूस हारपलं.

तिला पोंचवून तुकोबा येतात, तों पहिल्या बायकोला घरघर लागली ! तुकोबांच्यावर आभाळ कोसळलं ! आईवर फार जीव

होता त्यांचा. आईनंहि खूप केलं होतं त्यांचं. सगळं लहानपण आठवलं तुकोबांना. त्यांनीं इकडेतिकडे दुडुदुडु पळावं. आईनं हजार कामं टाकून धांवावं. आपल्या या अवखळ लेंकराला उचलून घ्यावं. तुकोबांना दांत येत होते लहानपणीं. ते शिवशिवायचे. कुठं कांहीं सांपडलं नाहीं, कीं त्यांनीं आईच्या दंडाला काडकन् चावावं! पण तें सगळं तिनं सहन केलं!

> **लेंकुराचें हित। वाहे माउलीचें चित्त॥**
> **ऐसी कळवळ्याची जाती। करी लाभावीण प्रीति॥**
> **पोटीं भार वाहे। त्याचें सर्वस्वही साहे॥**

लहानपणीं बोबडं, वांकडंतिकडं, वाटेल तें बोलावं. आईला त्याचंच किती कौतुक! बाळ माझं बोलतंय्!

> **जैसें तैसें बाळ मातेसी आवडे॥**
> **बोलतां बोबडे शब्द गोड॥**

अशी लाभावीण प्रीति करणारी माउली. ती गेली अन् आतां बायकोहि जाणार. ती कांहीं राहत नाहीं—काय वाटेल तें केलं तरी.

तुकोबा तिच्याजवळ बसले. त्यांनीं तिचं डोकं आपल्या मांडीवर घेतलं. डोळे मिटून श्रीहरीचं भजन सुरू केलं.

"श्रीहरी! तूं मला शक्ति दे—हें सगळं सहन करतां येईल अशी!"

शेवटीं तुकोबाच्या मांडीवरच तिचा प्राण गेला! एक दोरी तुटली! एवढ्यानं कांहीं भागलं नाहीं. थोरला मुलगा आजारी पडला!

घरांत पाणी नाहीं! आवलीनं हंडा उचलला डोईवर. तुकोबांना हांक मारलीन् तिनं.

"अहो!"

"काय आवले!"

"जरा याच्याजवळ बसतां का! मी पाण्याला जातें!"

" कुठून आणत्येस पाणी ?"

" आणत्यें डोहावरून !"

" पण तें घाण पाणी–"

" सगळा गांव पितोय्. चांगलं आणायचं कुठून ?"

तुकोबा मुलाजवळ बसले. त्यांच्या मांडविर हात ठेवून मुलगा म्हणाला,

" बाबा !"

" काय बाळ"

" भूक लागली हो !"

" थांब हां बाळ ! आई आली कीं देईल भाकरी !"

" बाबा !"

" काय बाळ !"

" तुम्ही माझ्याजवळ बसून राहा !"

" बसेन हां, बाळ !"

" बाबा !"

" काय बाळ ?"

" तुम्ही फार चांगले आहांत."

तुकोबांच्या डोळ्यांतून घळाघळा आंसवं वाहायला लागलीं ! खारट आसवं ! त्यांना वाटलं, आपण म्हटलं खरं कीं, आई देईल भाकरी. पण ती तरी कुठून देईल ?

किती सोसायचं तिनं तरी ? एवढे दिवस प्रपंच कसा चालतोय्, हें तिला ठाऊक. गुरं मेलीं, बैल मेले. म्हैस होती, ती चाऱ्याविना रानांतच बसली. तिथंच तिला फाडून खाल्ली कोल्ह्याकुत्र्यांनीं. असा हा मोडका संसार चालवत्येय् ती !

इकडे आवलीनं डोहावर पाण्याचा हंडा भरला. घराकडे निघाली. भर दुपारची वेळ. उन्ह कडाडून तापतंय्. पोटांत कांहीं पुरती अधींहि

भाकरी रोज जात नाहीं. सावकाराची लेक. सुखांतलं शरीर. पण हा असा काळ आलाय्.

पाय उन्हानं चटकताहेत. घामाच्या धारा चालल्या आहेत. डोक्यावरचा हंडा डोंगरासारखा जड झाला आहे. आतां नाहीं कळ निघत !

तरी घर अगदीं जवळ आलंय्. पोर पाण्यावांचून तडफडतंय्. त्याच्या घशांत घोट घातला पाहिजे !

चालली आवली.

पण—

" हें असं कां होतंय् ! हें सगळं माझ्याभोंवतीं फिरायला कां लागलंय् ? अगबाई ! अहो ! "

भोंवळ आली आवलीला. कष्ट सहन झाले नाहींत. धाडदिशीं खालीं कोसळली ! सगळं पाणी रस्ताभर पसरलं. कुत्रीं बसलीं होतीं हाडकुळीं. त्यांनीं धांवत येऊन चटाचटा चाटून घेतलं !

तुकोबांनीं आवाज ऐकला. ते धांवत बाहेर आले. त्यांनीं पाहिलं. आवली बेशुद्ध पडली होती. कपाळावर केवढी खोक पडली होती !

तुकोबांनीं तिला उचललं; घरांत आणलं. वारा घातला. ती शुद्धीवर आली. तों पोरगं किंचाळलं,

" आई ग ! "

" काय माझ्या लेंकरा ! "

" पाणी दे ! अगोदर पाणी दे ! "

कर्म !

तुकोबांनीं अन् आवलीनं खूप धडपड केली. पण पोर बरं झालं नाहीं. अन् एका दिवशीं अन्न अन्न करीत त्यानं आजीची वाट धरली !

आवली तर जशी वेडीपिशी झाली ! तुकोबांना शिव्या देऊं लागली !

" तुम्हींच-तुम्हींच माझं वाटोळं केलंत ? "

" आवले—"

" बोलूं नका एक शब्द सुद्धां ! त्या दगडाच्या देवाच्या नादीं लागलांत ! जो कधीं बोलत नाहीं, त्याच्या ! अन् संसाराचीं विधुळ-वाट केलीत ! "

" देवाची निंदा करूं नये, आवले ! "

" करीन करीन—खूप करीन ! काळा कळकुटा ! चोरटा-आधाशी. घे म्हणावं ! सासूबाईंना खाल्लंस ! बाईंना नेलंस ! पोराला उचललंस ! आतां मला उचल ! म्हणजे भरेल तुझा खळगा—"

" असं कां बोलत्येस, आवले ? "

" मग कसं बोलूं ? "

" देवाला माणसं मारायची हौस का आली आहे ? त्याला तेवढंच का काम आहे ? "

" हो हो ! त्या मेल्याला तेवढंच आहे ! कंसमामाला मारलंन्. जरासंध-शिशुपालाला मारलंन्. कौरवपांडवांचा नाश केलान्. तो आहेच माणसंमाऱ्या कसाई ! त्याच्या नादीं लागलांत तुम्ही ! तुम्हींहि तसेच झालांत. आई गेली. बाईल गेली. पोराला खाल्लंत आज ! आतां उरलं सुरलं मला खाऊन टाका. अन् दुसऱ्या पोराला तोंडीं लावा ! म्हणजे पोट भरेल तुमचं ! "

* * *

# ७. साधना

तुकोबांना फार वाईट वाटलं.

एवढे दिवस कसोशीनं प्रपंच केला. दुकान चालवलं. सावकारी केली. पैसा मिळत गेला. तोंपर्यंत सगळे चांगलं म्हणत होते. बायको कौतुक करीत होती.

आतां वाईट दिवस आले.

तीच बायको फाडून खायला लागली ! पण तिचंहि खरं आहे. दिलं घेतलं, तर लोक बरं म्हणतात.

**जन हे सुखाचे दिल्याघेतल्याचे ॥**

एवढे दिवस प्रपंचांत घातले. हातीं काय लागलं ?

कांहीं नाहीं—

नुसत्या शिव्या—

बायकोच्या शिव्या. लोकांच्या शिव्या.

सगळेच हाडहाड करतात. बायकोहि हाडहाड करते. सगळे मला वेडा म्हणतात. बायकोहि वेडा म्हणते.

**तुका वेडा अविचार । करी बडबड फार ॥**

तर मग आतां वेडाच होईन मी—

वडील गेले, त्या वेळीं फारशी प्रपंचाची चिंता नव्हती.

**बाप मेला न कळतां । नव्हती संसाराची चिंता ॥**

त्यानंतर आई गेली.

**माता गेली मज देखतां । तुका म्हणे हरली चिंता ॥**

बरं झालं. आतां मायापाश राहिला नाहीं.

**पोर मेलें बरें झालें । देवें मायाविरहित केलें ॥**

देव एकेक पाश तोडतोय्. मुलालाहि उचललंन् त्यानं. कर बाबा ! काय करायचं तें कर ! दुष्काळ पडला. मानखंडना झाली. बाईल गेली.

दुष्काळें आटिलें द्रव्य नेला मान ।
स्त्री एक अन्नअन्न करितां मेली ॥

फार चांगलं करतो आहेस बरं !

बरें झालें देवा निघालें दिवाळें ।
बरी या दुष्काळें पीडा गेली ॥

आवलीहि कर्कशेसारखं वागत्ये. जग माझी निंदा करतंय्. त्याच्या-बरोबर तीहि करत्येय. करूं दे. फार चांगलं होतंय्. असंच व्हायला पाहिजे.

बरें झालें देवा बाईल कर्कशा ।
बरी हे दुर्दशा जनामध्यें ॥

माझ्या पदरांत काय पडलं ?

तुझं चिंतन पडलं. महामोलाची वस्तु.

अनुतापें तुझें राहिलें चिंतन ॥

आतां मी तुझा होईन. दुसऱ्या कुणाचाहि नाहीं. तुझ्याच पायीं मुरकुंड मारून बसेन. बायकोपोरांची चिंता मी करणार नाहीं. होईल तसं होईल. पाऊस पडेल. शेतं पिकतील. बायकोपोरं कष्ट करतील अन् खातील. मी त्यांच्यांतून बाहेर पडेन !

आतां तुझं चिंतन, एकान्ताचा वास. तुझी पूजा. हेंच करायचं. दुसरं कांहीं नाहीं. यानंच तूं भेटलास तर भेटशील.

काळ साराया चिंतनें । एकान्तवासी गंगास्नानें ॥
देवाच्या पूजनें । प्रदक्षिणे तुळसीच्या ॥
परमार्थ महाधन । जोडी देवाचे चरण ॥
व्हावया जतन । हे उपाय लाभाचे ॥

आतां मी या शरिराची काळजी करायचा नाहीं. ती तुझ्यावर सोंपवीन. माझा भार तुझ्या खांद्यावर.

देह समर्पिजे देवा । भार कांहींच न घ्यावा ॥
होईल आघवा । तुका म्हणे आनंद ॥

या सगळ्याचा संबंध पुरे झाला आतां. नाहीं राहायचं यांच्यांत. एकान्तांत जायचं.

घडे एकान्ताचा वास । तरीच नास या संबंधाचा ॥

तिथं मी अन् माझा हरी. तो तरी भेटेल, नाहींतर शरीर तरी पडेल!

निघाले तुकोबा घराबाहेर. कुठंतरी लांब जायचं. इंद्रायणीचं कोरडं पात्र. तें ओलांडलं त्यांनीं. सगळी जमीन चिराळली होती. तिच्या-मधून चालले तुकोबा. कांटे आहेत, कुटे आहेत. बांध आहेत, झुरपुडं आहेत. पण तुकोबांचं तिकडे लक्ष नाहीं. ते चाललेत उत्तरेकडे.

शेतं गेलीं, माळरानं गेलीं, शिवा गेल्या, पण तुकोबा थांबले नाहींत. हरीचा छंद लागला त्यांना. भान उरलं नाहीं. देहू मागं पडलं. सुदुंबरंहि ओलांडलं त्यांनीं. पलीकडे एक वाडी लहानशी. तिथं सगळीं घरं ओसाड पडलेलीं. दुष्काळामुळं माणसं घरं सोडून गेलेलीं. कांहीं कुत्रीं मात्र होतीं अजून. तशींच उपाशीपोटीं जें मिळेल तें खाऊन राहिलीं होतीं घरं राखीत.

तुकोबांना पाहिलं त्यांनीं. शेपट्या हालवीत त्यांच्याजवळ आलीं. त्यांना वाटलं, तुकोबा कांहीं खायला देतील!

तुकोबांना तें उमगलं. ते खालीं बसले. त्या कुत्र्यांना जवळ घेतलं त्यांनीं. पाठीवर हात फिरवून म्हणाले,

"गडे हो! तुम्ही तुमच्या धन्यांचीं घरं सांभाळीत राहिलां, अशा दुष्काळांत सुद्धां! शाबास तुमची!

"तुम्हीं धन्याशीं इमान राखलंत. मीं कांहीं राखलं नाहीं! देवानं मला हा देह दिला, त्याचं भजन करण्यासाठीं, त्याला ओळखण्यासाठीं.

देवें दिला देह भजना गोमटा ॥

"पण मीं त्याची माती केली आतांपर्यंत. आतां उघडले डोळे. मी चाललोंय् धन्याच्या ओळखीला. त्याला भेटेन तरी, नाहीं तर हा देह टाकीन तरी."

"शेपटी कशाला हालवतां? भाकरीसाठीं?"

"भाकरी नाहीं रे माझ्याजवळ!"

त्यांच्या पाठीवर थापटलं तुकोबानीं. अन् ते निघाले.

पुढं भामचन्द्राचा डोंगर. त्याची नाळ समोर पसरलेली. तुकोबा चढायला लागले. लवणं, टेकाडं, वळणं हें सगळं ओलाडीत ते पोटाशीं गेले कड्याच्या. तिथं थबकले तुकोबा.

त्या ठिकाणीं एक गुहा होती. आजहि आहे. तिच्यांत शंभुमहादेव बसला आहे. डोंगरदऱ्यांचा राजा. पाण्याचीं एकदोन टाकीं आहेत. वर्षभर थंडगार पाणी असतं त्या टाक्यांत. भोंवतालीं झाडी आहे. तुकोबांनीं तें ठिकाण पाहिलं.

अगदीं आडवळणाचं ठिकाण. तिथं कोण कशाला जातंय्! कधीं-मधीं सर्पणासाठीं माणसं आलीं, तर यायचीं या डोंगराला. नाहीं तर मग गवताला यायचीं.

पण त्या वर्षीं पाऊस नाहीं, म्हणून गवत नाहीं. तेव्हां कुणी यायचं नाहीं तिथं. सर्पण नेणारीं माणसंहि यायचीं नाहींत. चुलीवर शिजवायला अन्नच नाहीं. मग सर्पण कोण कशाला साठवतंय्!

तुकोबांनीं ठरवलं.

"हें छान ठिकाण. इथंच राहायचं. चांगली छान जागा आहे.

वर आकाशाचा मांडव आहे. खालीं पृथ्वीचं आसन आहे. या ठिकाणीं माझं मन रमेल."

आकाश मंडप पृथिवी आसन।
रमे तेथें मन क्रीडा करी॥

तुकोबा गुहेंत शिरले. शंभुमहादेवाला नमस्कार केला त्यांनीं, अन् आंसवं पुशीत म्हणाले,

"विश्वाच्या नाथा! हा अनाथ तुमच्या दारीं आला आहे!

"आतां मला सांभाळा! मी दीन झालों आहें. तुमच्या कृपेचा एक कटाक्ष माझ्याकडे टाका. मल तेवढा पुरे. त्याहून जास्त नको.

"तुमच्याजवळ काय उणं आहे? तुम्ही महेश आहांत. नगेश हिमालय तुमचे सासरे. गणांचा राजा गणेश तुमचा मुलगा. धनांचा स्वामी कुबेर तुमचा मित्र. पण मला यांतलं कांहीं नको.

"थोडीशी प्रेमाची शिदोरी द्या. तेवढी मजजवळ असली, कीं मग मी आनंदानं इथं राहीन."

तुम्ही विश्वनाथ। दीन रंक मी अनाथ॥
कृपा कराल ते थोडी। पायां पडिलों बराडी॥
काय उणें तुम्हांपाशीं। मी तों अल्पचि संतोषी॥
तुका म्हणे देवा। प्रेम भातुकें पाठवा॥

तुकोबांनीं तिथं ठाण मांडलं. काय होईल तें होवो. हरी भेटल्याशिवाय इथून उठायचं नाहीं!

रात्रीं उगीच तास दोन तास अंग टाकावं, अन् उठून पुनः भजन करीत बसावं. तुकोबांचं पाठान्तर जबर. नामदेव, जनाबाई, ज्ञानोबा यांचे अभंग पाठ. ते म्हणावेत. देवाला आळवावं. त्याचा छंद ध्यावा.

गोविंद गोविंद। मना लागो हाचि छंद॥

तुकोबा रंगांत रंगून गेले. खाण्यापिण्याचं भान राहिलं नाहीं.

मध्येंच डोंगरावरून कांहीं माणसं उतरलीं. त्यांना खालच्या गांवांत जायचं होतं. त्यांनीं तुकोबांना पाहिलं. लागलीं चौकशी करायला.

"कोण रे?"

"कुणी तरी साधक दिसतोय्."

"साधक कुठला? चोरबीर असेल. चोरी केली, अन् इथं लपून राहिला."

"हे: ! चोर भजन कशाला करील?"

"खरं आहे. चांगला माणूस दिसतोय् हा."

"चला. आपण पायां पडूं."

आलीं माणसं आंत. पटापटा पायां पडलीं. विचारायला लागलीं,

"बुवा, तुम्ही कुठले?"

आतां काय करावं! तुकोबांनीं कसंबसं सांगितलं,

"आहे असाच कुठला तरी."

"इथं काय करतां?"

"देवाचं भजन करतों."

माणसं गेलीं. तुकोबांना वाटलं, इथंहि धडपणीं भजन होत नाहीं. पण मग जायचं तरी कुठं?

त्या गुहेपासून थोडक्या अंतरावर कड्याला पायऱ्या आहेत. चिंचोळया पन्नास पाऊणशें पायऱ्या. त्या चढून गेलं, कीं एक अगदीं चिंचोळं भुयार लागतं.

तुकोबांनीं ठरवलं. त्या भुयारांत जायचं. ते उठून भुयारांत पोंचले. आतां इथं कोण येईल अडमडायला? तिथं त्या भुयारांत तुकोबांची ब्रह्मानंदीं टाळी लागली. मग आतां देहाकडे कोण पाहातो?

**ब्रह्मानंदीं लागे टाळी। कोण देहातें सांभाळी॥**

आठ दिवस झाले, दहा झाले, बारा झाले, अन् पंधरावा उजाडला. पंधरा दिवस तुकोबा समाधींत होते. पंधरा दिवस त्यांना दिवस उगवायचं भान नव्हतं—मावळायचं नव्हतं. एका हरीकडे मन लागलं होतं.

अन् पंधराव्या दिवशीं त्यांनीं डोळे उघडले. त्यांना खूप बरं वाटलं! देवाचा साक्षात्कार झाला त्यांना.

या पंधरा दिवसांत त्यांची परीक्षाच झाली म्हणाना! साप आले, विंचू आले, वाघ आला. हे सगळे पीडा द्यायला लागले. फूत्कार टाकायला लागले. आरडले, ओरडले.

पण तुकोबांची समाधी लागली होती. ते जागे नव्हतेच मुळीं.

**पंधरा दिवसांमाजीं झाला साक्षात्कार।**
**विठोबा भेटला निराकार॥**
**भामगिरी पाठारीं वसती जाण केली।**
**वृत्ती स्थिरावली परब्रह्मीं॥**
**सर्प विंचू व्याघ्र अंगासी झोंबले।**
**पिडूं ते लागले सकळिक॥**
**निर्वाण जाणोनी घातिलें आसन।**
**आरंभिलें ध्यान देवाजीचें॥**

तुकोबा परीक्षेंत उतरले. त्यांचं मन समाधानानं भरलं. त्यांना वाटूं लागलं कीं, माझा हरि माझ्या हृदयांत आहे. तो बाहेरहि आहे. सगळीकडे आहे तो. जिथें जातों तिथें तो बरोबर येतो. माझं बोट धरून तो माझा बाप चालतो.

आपण वेडंवाकडं बोलावं, तो तें नीट करतो. त्यानं माझ्या मनांतली लाज घालवून दिली. मला धीट केलं, आतां मला कांहीं काळजी राहिली नाहीं. आतां कौतुकानं खेळायचं, नाचायचं, बागडायचं.

जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती ।
चालवीसी हातीं धरोनिया ॥
चालों जातां आम्हां तुझाचि आधार ।
चालविसी भार सर्व माझा ॥
बोलों जातां बरळ करिसी तें नीट ।
नेली लाज धीट केलों देवा ॥
अवघे जन मज झाले लोकपाळ ।
सोईरे सकळ प्राणसखे ॥
तुका म्हणे आतां खेळतों कौतुकें ।
झालें तुझें सुख अन्तर्बाह्य ॥

आतां आनंदीआनंद आहे. श्रीविठ्ठल भेटला आहे. त्यानं दर्शन दिलं आहे.

पण घरीं काय झालं होतं?

तुकोबा गेले, आवलीला वाटलं, येतील आपच! जाताहेत कुठं? आज नाहीं आले तर उद्यां येतील.

पण उद्यांहि नाहीं, परवांहि नाहीं. आठ दिवस झाले, तरीहि नाहीं. मग मात्र आवलीला भीति वाटायला लागली! हे गेले तरी कुठं?

ती आपली देवळाच्या दारांत उभी राही. अन् येत्याजात्याला विचारी,

"आमचे हे दिसले का हो कुठं?"

"नाहीं बुवा!"

"आमच्या यांना पाहिलंत का हो कुठं?"

"छे बुवा!"

"अहो आत्याबाई, आमचे हे आढळले का कुठं?"

"नाहीं ग बाई!"

आवलीचं धाबं दणाणलं. तुकोबाचा धाकटा भाऊ. कान्होबा

त्याचं नांव. लग्न झाल्यापासून तो वेगळा राहायचा. आवली त्याच्या घरीं गेली.

" भावजी ! "

" काय वहिनी ? "

" अहो, आज दहा दिवस झाले, यांचा कुठं पत्ता नाहीं ! " .

" नाहीं ? "

" नाहीं हो ! त्या दिवशीं मी मेली फडाफडा बोलल्यें त्यांना ! तेव्हांपासून कुठं गेले कोण जाणे ! "

" मग आतां ? "

" आतां जाऊन शोधा तरी ! "

कान्होबा निघाला. तुकोबांचीं सगळीं ठिकाणं शोधलीं त्यानं. बल्लाळाची बाग पाहिली. आमराई पाहिली. नदीकांठचीं देवळं धुंडाळलीं. पण तुकोबा नाहींत.

घरीं येऊन कान्होबानं सांगितलं,

" वहिनी, दादा नाहीं कुठं ! "

आवली ओक्साबोक्शीं रडायला लागली. कान्होबा म्हणाला,

" वहिनी, रडत्येस कशाला ? "

" मग काय करूं. भावजी ? मला भय वाटतंय्—"

" कसलं भय ? "

" ते—ते नाहींत— "

" हेः ! वेडी कुठली ! रडूं नकोस. "

" मग काय करूं, भावजी ? "

" जरा धीर धर. "

" कसा धीर धरूं ? "

" दादा कुठं तरी एकान्तांत गेला असेल. "

" कुठं ? "

" भंडाऱ्यावर नाहीं तर भामचंद्रावर."

" पण एवढे दिवस—अन्न नाहीं, पाणी नाहीं !"

" असूं दे. जाऊन येतों."

" जा भावजी ! त्यांना शोधून आणा. कातड्याचे जोडे करून तुमच्या पायांत घालीन !"

कान्होबा निघाला. भंडारा शोधला त्यानं. तुकोबा नव्हते. मग तो निघाला भामचंद्रावर. तिथं जाऊन देवळांत पाहिलं त्यानं, पण तिथंहि नाहींत !

मग त्याला आठवलं. इथं वर एक भुयार आहे. ता अगदीं जपून वर चढला. अन् त्यानं पाहिलें—

हरिरंगानं रंगलेले तुकोबा तिथं भजन करीत होते !

" दादा !"

तुकोबांनीं डोळे उघडले.

" कोण ? कान्हया !"

कान्होबानं तुकोबांना मिठी मारली. त्याला रडायला आलं. तुकोबा त्याच्या पाठीवर हात फिरवीत म्हणाले.

" कान्होबा, रडतोस कशाला ?"

" दादा, तुम्ही इथं होतांत—या वाघाच्या गुहेंत !"

" कान्होबा, आपल्याला वाघ काय करतो ?"

" कांहीं नाहीं करीत ?"

" नाहीं, चित्त शुद्ध असलं म्हणजे वाघहि कांहीं करीत नाहीं, अन् सर्पहि कांहीं करीत नाहीं."

चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती ।
व्याघ्रही न खाती सर्प तया ॥

" पण दादा, एवढे दिवस तुम्ही जेवायचं काय करीत होतां ?"

" एवढे म्हणजे किती ?"

"तुम्हांला नाहीं माहीत?"

"माझ्या लक्षांत नाहीं रे!"

"आज पंधरा दिवस झाले तुम्हांला घर सोडून"

"कोण जाणे गड्या! माझं लक्षच नव्हतं!"

"मग काय करीत होतां?"

"मी? मी हरिरंगांत रंगलों होतों! जेवण झाल्यासारखं वाटे. इच्छा राहिली नाहीं. आनंदाचे कढांवर कढ येत."

झालें भोजनसें दिसे। चिरा पडोनि ठेला इच्छे।
घालियाचिया ऐसे। अंगा येती उद्गार॥

"पण दादा, घरीं—"

"हो गड्या! आवली बरी आहे ना?"

"तुम्ही घरीं चला बघूं. वहिनी पार गरंगळली आहे."

"चला. कान्होबा, आतां कांहीं क्लेश राहिले नाहींत रे!"

दोघे निघाले. संध्याकाळीं घरीं आले. मातीची पणती पेटवून आवली वाट पाहात होती. तिचे प्राण तिच्या डोळयांत उभे होते. कान्होबानं तुकोबांना घरीं सोडलं, अन् आपण तिथून गेला.

आवलीनं तुकोबांच्या पायांवर डोकं ठेवलं. आपल्या आसवांनीं ते पाय धुऊन काढले. तुकोबांनीं तिच्या पाठीवरून हात फिरवला. ती रडत रडत म्हणाली,

"अहो! अगोदर तुम्ही मला क्षमा केलीत, असं म्हणा!"

"कशाबद्दल, आवले?"

"तुम्हांला वाकूडपणानं बोललें त्याच्याबद्दल!"

"आवले—"

"करा हो! क्षमा करा! आतां नाहीं मी बोलायची!"

"आवले, मी तुझ्यावर रागावून का गेलों होतों?"

"नव्हतांत गेलां?"

"नाहीं."

"मग?"

"मी गेलों होतों देवाच्या भेटीसाठीं."

"मग भेटला देव?"

"तो कुठं लांब नव्हता, आवले. माझ्याजवळच होता."

"मग आतां कुठं जाणार नाहीं ना?"

"नाहीं, आवले. आतां नेहमींकरितां कुठं जायचा नाहीं."

मग आवलीनं कळण्याकोंडयाची भाकरी केली. तुकोबा जेवायला बसले. ते म्हणाले,

"आवले, तूंहि बैस ना!"

"तुम्ही घ्या जेवून. मी बसेन मागाहून."

"बैस ग!"

लाजून आवली म्हणाली,

"तुम्ही जेवा!"

दुसरे दिवशीं तुकोबांनीं कागदपत्रं बाहेर काढलीं. त्यांत गहाणपत्रं होतीं, खरेदीखतं होतीं. तारणगहाणखतं होतीं, कबजेगहाणखतं होतीं. तुकोबा कान्होबाला बोलावून म्हणाले,

"कान्होबा!"

"काय दादा?"

"असं बघ, दुष्काळ पडला. आतां या आपल्या कुळांत कांहीं आपलं देणें द्यायची शक्ति राहिली नाहीं."

"मग काय म्हणतां?"

"हीं कागदपत्रं करायचीं काय?"

"मग काय करायचं यांचं?"

"मी म्हणतों इन्द्रायणींत बुडवून टाकायचीं!"

"दादा!"

"हो कान्हया! दुष्काळानं माणसं गांजलीं. त्यांत आमचं-देणं देण्याचा भार कशाला त्यांच्या डोक्यावर? अन् मग ठेवून तरी काय करायचीं हीं? उगीच नसती आशा!"

कान्होबा आपला व्यवहारी माणूस. त्याला कांहीं पटेना. तो म्हणाला,

"दादा, सावकारी तुमची अन् माझी, दोघांची. खरं ना?"

"हो."

"तर मग तुम्ही तुमच्या वांट्याचीं खतपत्रं बुडवा. माझीं मला द्या."

"जशी तुझी इच्छा."

तुकोबांनीं त्या पत्रांचे दोन ढीग केले. कान्होबाला म्हणाले,

"उचल बाबा यांतला एक."

कान्होबानं एक ढीग चललान्. दुसरा ढीग घेऊन तुकोबा इन्द्रायणीवर गेले. त्यांचं एक गांठोडं केलं. त्यांत एक दगड बांधला, नि पाण्यांत शिरले. इन्द्रायणीला म्हणाले,

"मायबाई, सांभाळा हा मायापाश! करा मला यांतून मोकळं!"

लोक लागले हंसायला. म्हणत,

"झालं? होतं नव्हतं पोट भरायचं साधन, तेंहि बुडवून टाकलं."

"आतां मागा म्हणावं भीक!"

"नाहीं तर काय!"

आवलीहि मनांतल्या मनांत चरफडे, पण मोठ्यानं बोलायची सोय नाहीं. हें माणूस पुनः घरांतून गेलं, तर ध्या काय!

* * *

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# ८. उपासना

अन् तुकोबा ? ते अजिबात बदलले. त्यांचा विठ्ठल सगळीकडे आहे आतां. गाईगुरांत. पोराबाळांत. म्हाताऱ्याकोताऱ्यांत. त्यांना कळलं. रंजल्यागांजल्यांत देव आहे. त्यांची सेवा करील, तो माणूस चांगला. ज्याला कोणी त्राता नाहीं, त्याला पोटाशीं धरावं. पोरांवर जेवढं प्रेम, तेवढंच गड्यामाणसांवर करावं; कारण विठ्ठल या सगळ्यांत आहे.

जे कां रंजले गांजले ।
त्यांसि म्हणे जो आपुले ।।
तोचि साधु ओळखावा ।
देव तेथेंचि जाणावा ।।
ज्यासी अपंगिता नाहीं ।।
त्यासी धरी जो हृदयीं ।।
दया करणें जे पुत्रासी ।
तेचि दासा आणि दासी ।।
तुका म्हणे सांगूं किती ।
तोचि भगवंताची मूर्ति ।।

सकाळीं आंघोळीला गांवाबाहेर नदीवर जावं. तिथं कुणी म्हातारी पाण्याचा हंडा घेऊन यायची. थरथरत, कांपत तो घासायची. पाण्यानं भरायची. मग लोकांना म्हणायची,

"ए बाळांनो ! कुणी मला उचलूं लागतां का रे ?"

गांवचीं टवाळ माणसं. त्यांनीं दांत काढावे, चालूं लागावं.

तुकोबांनीं तें पाहावं. त्यांचं मन कळवळावं. ते म्हातारीजवळ जात. म्हणत,

"आजीबाई, तुम्ही वरच्या आळीला राहातां ना?"

"हो रे माझ्या राजा!"

"मग चला पुढं. मी घेतों तुमचा हंडा."

"तूं!"

"हो. कां? मी तुमचं लेंकरूं नाहीं का?"

"आहेस ना! माझं लेंकरूंच आहेस ना बाबा, तूं!"

मग बाबांनीं हंडा डोईवर घ्यावा. म्हातारीच्या घरीं नेऊन पोंचवावा. टवाळांनीं हंसून म्हणावं,

"बरा बैल राबतोय्!"

पाऊस पडला. चहूंकडे हिरवळ झाली. पण गाईगुरं पार थकलीं होतीं. तीं अगदीं उठवणीला आलीं. त्यांच्याच्यानं रानांत जाववेना. एवढा थोरला हिरवा चारा भोंवतीं पसरलेला. पण आपलीं आशाळपणानं त्याच्याकडे पाहात असायचीं. अंगांत जोर कांहीं राहिला नाहीं.

तुकोबांनीं हें पाह्यलं. ते आवलीला म्हणाले,

"आवले, जरा खुरपं दे ग!"

"कशाला?"

"गवत आणायला जातों रानांत."

आवलीला फार बरं वाटलं. तिनं पटकन् खुरपं अन् पटकूर आणून दिलं. बाबा दिवसभर रानांत खपले. एवढा थोरला गवताचा भारा केला. डोक्यावर घेऊन परतले. जिथं जिथं थकलेलीं गुरं होतीं, तिथं तिथं त्यांनीं त्यांच्यापुढं गवत टाकलं. पोटभर गवत. त्या गुरांच्या पाठीवर हात फिरवला. त्यांना पाणी पाजलं अन् संध्याकाळीं घरीं परतले.

तुकोबांना पाहून आवली म्हणाली,

"हें काय!"

"काय झालं?"

"गवत कुठं आहे?"

"घातलं कीं गुरांना."

"कुठल्या गुरांना?"

"आवले, म्हाताऱ्या गुरांना, थकलेल्या गुरांना! तुझ्या म्हशीला तूं गवत घेऊन घालतेस, त्या बिचाऱ्यांना कुणी घालीत नाहीं. मरायचीं तशींच पाय घाशीत. मला वाईट वाटलं, म्हणून त्यांच्याकरितां आणलं मीं गवत."

आवलीनं कपाळाला हात लावला. पण बोलते कोणत्या तोंडानं? पुनः तुकोबा घर सोडून गेले, तर घ्या काय! म्हणून ती कांहींच बोलली नाहीं. काय वाटेल तें करा. घर सोडून जाऊं नका म्हणजे झालं.

तिनं अन् कान्होबानं, दोघांनीं मिळून शेत लागवडीला आणलं. एकदां धीर करून ती तुकोबांना म्हणाली,

"अहो, ऐकलंत का?"

"काय आवले?"

"मी म्हणतें, लहानसं दुकान घालून तिथं बसलांत घटकाभर, तर नाहीं का भागायचं?"

"लहानसं? लहानसं नव्हे, आवले. मी मोठं दुकान घालतोंय्."

आवलीला आश्चर्य वाटलं. ती म्हणाली,

"कशाचं?"

हसून तुकोबा म्हणाले,

"ऐक, आवले. मीं भक्तिभावाचं दुकान मांडलंय्. सुखाच्या पेठेंत त्याची मांडणी केली आहे. रामनाम हा माल भरलाय्. हंसतेय काय आवले? मागं भल्याभल्यांनीं हाच माल भरला होता. या मालांत मिसळ नाहीं, भेसळ नाहीं. घातपात व्हायचा नाहीं. ज्याचं चित्त शुद्ध असेल, त्यानं खुशाल वाटेल तेवढा लुटून न्यावा. पै कांहीं खर्चावी लागायची नाहीं."

भक्तिभाव आम्हीं बांधिलासे गांठीं ।
सादावितों हाटीं घ्या रे कोणी ॥
सुखाचिया पेठे घातिला दुकान ।
मांडियेला वान रामनाम ॥
मागें भाग्यवंत झाले थोरथोर ।
तिहीं केला फार हाचि सांठा ॥
सुखाचें फुकाचें सकळाचें सार ।
तरावया पार भवसिंधु ॥
खोटें कुडें येथें नाहीं घातपात ।
करीं शुद्ध चित्त तुका म्हणे ॥

याच्यापुढं आवली काय बोलणार !

भजन–कीर्तनाला रंग चढत चालला. संध्याकाळीं वीणा घेऊन राउळांत उभं राहावं. लाजबीज पार पळवून लावावी. गावं, नाचावं, विठ्ठलस्मरणांत गुंग व्हावं. रात्रंदिवस विठ्ठलनामापलीकडे कांहीं बोलूं नये.

गांवांत सगळींच माणसं कांहीं वाईट नसतात. कांहीं टवाळ, तर कांहीं सज्जन. टवाळांनीं तुकोबाची थट्टा करावी. पण सज्जनांनीं म्हणावं,

"खरंच, तुकोबा चांगला आहे."

"हो ना ! फारच चांगला."

"रात्रंदिवस देवाचं नांव घेत असतो."

"गोरगरिबांना मदत करीत असतो."

"परवां एक पोर वाटेंत रडत होतं. त्याला उचलून तुकोबानं घरीं पोंचवलंन्."

"एक आंधळा वाटेनं चालला होता. उपाशी होता बिचारा. त्याला तुकोबानं जेवायला घातलंन्. मग येळवाडीला नेऊन पोंचवलंन्."

"अहो, आपण ओळखलं नाहीं त्याला !"

" तर काय ! फार मोठा साधु आहे तो ! "

निंदा व्हायला लागली, कीर्तिहि वाढायला लागली.

विश्वंभरबावांनीं विठ्ठलरखुमाईच्या मूर्ति आणल्या. त्यांचं देऊळ बांधलं. त्याला झालीं शेंदोनशें वर्षे. आतां बहालांना लागली कीड. सभामंडप भंगला. तुकोबा कान्होबाला म्हणाले,

" कान्होबा, देऊळ पडत चाललं रे ! "

" मग आतां काय करायचं ? "

" बांधायला घेतलं तर ? "

आवली भाकरी करीत होती. ती म्हणाली,

" बांधायला घ्यायचं म्हणजे काय सोपं काम आहे ? "

" सोपं नाहीं तर काय आवले ? "

" अन् मजुरांना काय देऊं ? माझे दांत पाडून दिले तर चालतील ? "

" असं काय बोलतेस, आवले ? "

" मग कसं बोलूं ? जवळ पै नाहीं—"

" नसूं दे पै. तसंच बांधायचं देऊळ."

" तसंच ? "

" हो. मी माती आणून देईन. तूं पाणी आण. कान्होबा चिखल करील. आहेत त्याच विटा वापरूं. कसं कान्होबा ? "

" हां दादा, हें छान आहे. पण गवंडी ? "

" करायचा काय गवंडी ? असा काय मोठा इमला उभा करायचाय् ? मग आवले ? "

" तुमच्या बाहेर का मला जातां तंय् ! "

झालं. दुसऱ्या दिवसापासून झाली कामाला सुरुवात. तिघंहि लागलीं खपायला. हें पाहिलं गांवकऱ्यांनीं, त्यांना वाटलं, हीं तिघंच बिचारीं करताहेत काम. आपणहि लागावं यांच्या मदतीला.

सुतार आला. तुकोबांना म्हणाला,

"तुकोबा, मी करूं का तुम्हांला मदत?"

"काय कराल?"

"बहालं तासून देईन. दारांवर रंधा फिरवीन. खिडक्या मोडल्या त्या घडून देईन–"

"पण आमच्याजवळ पैका नाहीं तुम्हांला द्यायला!"

"नको मला पैका. तुमचीं लाकडं, माझी मेहनत."

"फुकट कराल?"

"करीन तर काय! एवढं तुम्ही खपतांय्. मीहि लावीन थोडासा हातभार."

"ठीक आहे. पांडुरंगाची इच्छा."

मग सुतार आला. लोहार आला. त्यांचं पाहून गवंडी आला. त्यानं हांक मारली म्हणून बेलदार आला. पाहतां पाहतां देऊळ उभं राह्यलं.

रोज रात्रीं या सगळ्या कामकऱ्यांनीं देवळांत जमावं. तुकोबांनीं भजन करावं. यांनींहि करूं लागावं. कधीं कधीं तुकोबांनीं कीर्तनहि करावं. त्यांनीं म्हणावं,

"गडे हो! काम करतांना रामनाम घ्या. त्यानं कामाचा भार हलका होतो. मनांत समाधान डोकावयाला लागतं."

**कामामध्यें काम। कांहीं म्हणा रामनाम।**
**जाईल भवश्रम। सुख होईल दुःखाचें॥**

देऊळ बांधलं. लहानशी समाराधनाहि झाली. तुकोबांना धन्य धन्य झालं. ते पांडुरंगाला म्हणाले,

"श्रीहरी, तुझं राऊळ भंगलं होतं. मनांत इच्छा उभी राह्यली–तें बांधून काढावं."

देवाचें देऊळ होतें जें भंगलें ।
चित्तासी तें आलें करावेंसें ।।

मी तरी कुठून बांधणार! तुझं काम तूं पुरं करून घेतलंस. हीं सगळीं गांवकरी माणसं—यांच्या मनीं तूं उभा राह्यलास. तुझं राऊळ तूं बांधवून घेतलंस"

* * *

## ९. गुरुकृपा

तवा तापत चालला. मन शुद्ध झालं. राग पळून गेला. लोभ विठ्ठलपायीं वाहिला. तुकोबा चंदनासारखे झिजायला लागले.

पण अजून कोणी गुरु मिळाला नाहीं, वाट दाखवणारा भेटला नाहीं. भक्तीचा मार्ग तर हा असा आहे. कुणीतरी वाटाड्या लागतो.

तुकोबांना चिंता—कोण गुरु भेटेल? कोण वाट दाखवील?

पण ते कुणाकडे गेले नाहींत. त्यांना खात्री होती. माझी तयारी झाली, तर माझा पांडुरंगच गुरुरूपानं समोर उभा राहील. तोच गुरु होतो. सगळ्या इच्छा पुरवतो. शेवटीं आपल्या पायाशीं नेतो. मागंपुढं उभा राहून जपणूक करतो. आपत्ति येतात, त्यांच्याशीं टक्कर देतो. आपल्या भक्ताची सगळी काळजी वाहातो. हवं नको पाहतो. हातीं धरून नीट रस्त्यानं नेतो. कुठं चुकूं देत नाहीं.

माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव ।
आपणचि देव होय गुरु ।।
पढिये देहभाव पुरवी वासना ।
अंतीं ते आपणापाशीं न्यावे ।।
मागें पुढें उभा राहे सांभाळीत ।
आलिया आघात निवारावे ।।

योगक्षेम त्यांच जाणे जडभारी ।
वाट दावी करीं धरोनीयां ॥
तुका म्हणे नाहीं विश्वास ज्या मनीं ।
पहावें पुराणीं विचारून ॥

अन् मग त्यांना गुरु भेटला का?

भेटला. त्याला कुठं शोधीत जावं लागलं नाहीं. शके १५५४ या सालचा माघ महिना उजाडला. गुरु भेटावा, ही तळमळ तगमग चाललेली. शुद्ध दशमीची गोष्ट. गुरुवार होता त्या दिवशीं. रात्रीं भजन झालं अन् तिथंच रावळांत झोंपले तुकोबा. स्वप्न पडलं त्यांना.

खांद्यावर धोतर टाकलंय्. हाती तांब्या अन् गोपीचंदाचा गोळा आहे. तुकोबा पहाटे निघाले आहेत इन्द्रायणीच्या स्नानाला. मुखानं हरिनामाचा गजर चालला आहे.

एवढ्यांत समोरून श्रीगुरुराय आले. मुद्रा प्रसन्न होती. त्यांनीं हांक मारली.

"तुकोबा!"

तुकोबा भानावर आले. त्यांनीं ओळखलं. ज्यांची आपण वाट पाहात होतों, तेच हे!

त्यांनीं पटकन् पाय धरले. आंसवांनीं त्यांना आंघोळ घातली. सद्गुरुरायांनीं मस्तकावर हात ठेवला. उचलून हृदयाशीं धरलं. मिठी मारली. म्हणाले,

"ओळखलंस?"

"ओळखलं."

"माझं नांव बाबाजी चैतन्य. माझे गुरु राघव चैतन्य. त्यांचे केशव चैतन्य. ही आपली परंपरा. आतां मंत्र सांगायचा राहिला."

"कोणता मंत्र?"

" रामकृष्णहरि ! "

तुकोबा आनंदानं बहरून गेले. रामकृष्णहरि म्हणत नाचूं लागले. श्रीगुरूंनीं मध्येंच हटकलं,

" तुकोबा, भूक लागली रे ! "

" मग काय आणूं ? "

" बाकीचं सगळं आहे. पावशेर तूप तेवढं आण. "

तुकोबा धांवत पळत घरीं निघाले. तूप घेऊन नदीवर आले. तों सद्गुरु कुठं आहेत ! तुकोबांना वाईट वाटलं. हें असं काय केलं सद्गुरूंनीं ? तूप मागितलं, अन् निघून कां गेले ? माझ्याकडून कोणता अपराध घडला ?

एवढ्यांत तुकोबा जागे झाले. त्यांना स्वप्न आठवलं. तसे ते आनंदानं वेडे झाले. म्हणूं लागले.

" मला श्रीगुरु भेटला ! आतां कसली काळजी राहिली नाहीं. खरोखरीच माझ्यावर कृपा केली श्रीगुरूंनीं ! "

सत्य गुरुरायें कृपा मज केली ।
परि नाहीं घडली सेवा कांहीं ॥
सांपडविलें वाटे जातां गंगास्नाना ।
मस्तकीं तो जाणा ठेविला कर ॥
भोजना मागती तूप पावशेर ।
पडिला विसर स्वप्नामाजीं ॥
काय कळे उपजला अंतराय ।
म्हणोनियां काय त्वरा झाली ॥
राघव चैतन्य केशव चैतन्य ।
सांगितली खूण माळिकेची ॥

वाबाजी आपुलें सांगितलें नाम ।
मंत्र दिला रामकृष्ण हरी ॥
माघ शुद्ध दशमी पाहोनि गुरुवार ।
केला अंगिकार तुका म्हणे ॥

तुकोबांना धन्य धन्य झालं. श्रीगुरूंनीं त्यांना पावन करून घेतलं.

* * *

## १०. अभंग-रचना

आतां चहूंकडे आनंदच आनंद.

आनंदाचे डोहीं आनंद तरंग ।
आनंदाचि अंग आनंदाचें

संतांनीं तुकोबांना सरतं केलं, आपलासा केलं. अन् त्यांत आणखी एक गंमत झाली. नामदेव अन् स्वतः पांडुरंग स्वप्नांत आले. त्यांनीं सांगितलं.

"तुकोबा, आतां तुम्ही जें सुचेल तें बोलत जा! अभंग करीत जा."

"देवा, मला कसं जुळेल?"

"जुळेल, आम्ही आहों ना तुमच्या पाठीशीं उभे!"

नामदेवें केलें स्वप्नामाजीं जागें ।
सवें पांडुरंगें येवोनीयां ॥
सांगितलें काम करावें कवित्व ॥

तुकोबा आनंदानं उठले. रावळांत गेले. मूर्तीसमोर उभे राहिले. अन् अचानक अभंग सुचायला लागले. गंगा वाहायला लागली.

"श्रीहरी!" तुझं हें रूप मला भारी आवडलं! माझे डोळे सुखावले!"

आवडे हें रूप गोजिरें सगुण ।
पाहातां लोचन सुखावले ॥
आतां दृष्टीपुढें ऐसाचि तूं राहे ।
जंव मी तुज पाहें वेळोवेळां ॥
लाचावलें मन लागलीसे गोडी ।
ते जीवें न सोडी ऐसें झालें ॥
तुका म्हणे आम्हीं मागावें लडिवाळी ॥
पुरवावी आळी मायबापा ॥

अन् मग बोलतां, चालतां, काम करतां, बसतां, उठतां तुकोबांच्या तोंडून अभंगच निघायला लागले!

भोंवतालची मंडळी म्हणत,

"तुकोबा, हें कसं येतं तुम्हांला?"

"मला? मला नाहीं येत."

"मग?"

"मला श्रीहरी बोलवितो."

माझिये युक्तीचा नोहे हा प्रकार ।
मज विश्वंभर बोलवितो ॥

"पण मग दिवसभर कसे अभंग करतां येतात तुम्हांला?"

"गडे हो! हा माल माझ्या धन्याचा आहे. त्याचं भांडार फुटलं आहे. मी तर नुसता हमाल. ओझीं वाहणारा."

फोडिला भांडार धन्याचा हा माल ।
मी तंव हमाल भारवाही ॥

एकेक अभंग जन्माला यायला लागला. कधीं बाबा विठ्ठलाचें वर्णन करीत, तर कधीं त्याच्या भक्तीचे अभंग गात. कधीं त्याच्या भेटीची उत्सुकता दाखवीत. कधीं त्याच्याशीं सलगीनं बोलत. कधीं कधीं तर त्याच्याशीं प्रेमाचं भांडणहि भांडत. पण मग त्या दोघांत दोस्ती होई. मग तुकोबा त्याच्याजवळ मागणं मागत. कसलं मागणं ? दुसरं कसलं ! त्याचा विसर पडूं नये, हें मागणं.

हेंचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।।

कधीं कधीं ते त्याची करुणा भाकीत, तर कधीं त्याला सांगत,

"तुला रूप नाहीं, तर मग मलाहि नाहीं. तूं खरा, तर मी खरा. तूं खोटा, तर मग मीहि खोटा !"

तुज रूप जरी नाहीं ।
तरी माझें दाव काई ।।
साच तूं लटिका ।
तैसा मीही म्हणे तुका ।।

अभंगाची रचना व्हायला लागली. पण हें लिहून कुणी ठेवायचें ?

बाबांचा बालपणचा संवगडी. कुटुंबऱ्याचा संताजी जगनाडे. त्यानं हें मनावर घेतलंन्. बुवांनीं अभंग केला, कीं लगेच संताजीनं तो लिहून काढायचा. मग बाबांनींहि चांगल्या नीट, स्वच्छ अक्षरांत त्याची प्रत करून ठेवावी.

बाबा कीर्तनाला उभे राहात. मागं टाळकरी मंडळी. मोठी मजा येई कीर्तनाला. त्या कीर्तनांत बाबा लोकांना उपदेश करीत. कधीं प्रेमानं, कधीं पाठीवर हात फिरवून, तर कधीं कधीं रागावूनहि. कुणीकडून तरी लोकांनीं नीट मार्गानं चालावं.

बाबांची कीर्ति वाढत चालली. गांवोगांवची मंडळी बाबांच्या कीर्तनाला यायला लागली. कुणी बैलगाड्या जोडून, कुणी पायीं, कुणी घोड्यावर. संध्याकाळीं ही लोकांची गर्दी.

"काय हो, कुठं निघालांत ?"

"देहूला."

"कशाला ?"

"वा: ! तुम्हांला नाहीं का माहीत ?"

"काय ?"

"तुकारामबावा कीर्तन करतात रोज रात्रीं."

"कोण तुकारामबावा ?"

"आंबिले. देहूचे महाजन. फार छान कीर्तन करतात. जन्माला यावं अन् त्यांचं कीर्तन ऐकावं."

"एवढं चांगलं करतात ?"

"एकदां ऐका कीं ! म्हणजे खात्री पटेल !"

मग भराभरा बाया, माणसं, पोरं, म्हातारे, अशीं सगळीं जणं देहूला धांव घेत. बावांचं कीर्तन ऐकत. त्यांनीं रचलेले अभंग पाठ करीत. अन् मग त्या नादांत नाचत, डोलत घरीं परतत.

* * *

## ११. छळ

देहूंत बावांच्या घरामागंच एक बुवा राहात असे. त्याचं नांव मंबाजी. केवढा त्याचा थाटमाट ! त्याची एक खूप मोठी बाग होती. त्या बागेंत एक छोटंसं देऊळ. त्या देवळासमोर मंबाजीबुवाची धुनी. त्या धुनीजवळ एक वाघाचं कातडं. कातड्यावर बुवा बसायचा. कपाळावर शेंदूर. डोक्यावर हा थोरला जटांचा भारा.

बुवाजवळ गांजा पिण्यासाठीं भक्तमंडळी जमायची. चिलीम झाल्यावर मग चकाट्या पिटायची. याची निंदा, त्याची निंदा. सगळ्या गांवाच्या चांभारचौकश्या चालायच्या.

मंबाजीबुवा कुणाला ताईत द्यायचा. कुणाला दोरे द्यायचा. कुणाला भस्म द्यायचा. त्याच्या अंगांत देव यायचा म्हणे ! तो देव त्याच्याकडे आलेल्या माणसांजवळ लोणी, तूप, साखर, गाय, लाडू, जिलबी, असं मागायचा !

तीं भोळीं माणसं आणून द्यायचीं. मग मंबाजीबुवाची चंगळ व्हायची !

पण तुकारामबावांच्या कीर्तनाला मंडळी जमायला लागली, तसा मंबाजीबुवाला संताप यायला लागला. गांजा प्यायला टवाळ जमत, त्यांना तो म्हणे,

"हा तुक्या भारी माजला !"

"हो महाराज !"

"कीर्तन काय करतो ! नाचतो काय ! अभंग काय करतो !"

"अगदीं खरं आहे !"

"अन् लोकहि बेटे असे मूर्ख आहेत ! त्याच्या कीर्तनाला कोण गर्दी !"

"हो ना !"

"आमच्याकडे कुणी येईनासं झालं !"

"झालं खरं असं !"

"याच्यावर कांहीं इलाज केला पाहिजे !"

"जरूर करायला हवा."

बावांच्या विठ्ठलमंदिराच्या पिछाडीपर्यंत मंबाजीबुवाची बाग होती. एका दिवशीं मंबाजीबुवानं बाभळीच्या कांट्यांचा भारा आणला, अन् तो देवाच्या प्रदक्षिणेच्या वाटेवर लावून टाकला. प्रदक्षिणेला जागा उरली नाहीं !

सकाळीं बावा देवळांत आले. पांडुरंगाचं दर्शन घेतलं त्यांनीं. अन् प्रदक्षिणेला सुरुवात केली. पाहातात तों वाट कुठाय् ! तुकाराम-

बावांच्या मागोमाग दुसरा एक बापडा दर्शन घेऊन आला. त्याला बावांनीं विचारलं,

"काय हो, प्रदक्षिणेची वाट कुणीं बंद केली?"

"मंबाजीबुवांनीं."

"कां?"

"ते म्हणतात, कीं प्रदक्षिणेला माणसं येतात, त्यामुळं त्यांना त्रास होतो."

"कसला त्रास होतो?"

"कोण जाणे!"

"त्यांना त्रास कसा होईल? इथून कितीतरी लांब त्यांचा मठ. इथं देवदर्शनाला माणसं आल्यानं तिथं त्यांना त्रास कसा काय होतो?"

"तें कुणाला माहीत? पण ते असं बडबडत होते, एवढं खरं."

"इथं देवदर्शनाला कितीतरी माणसं येतात. प्रदक्षिणा करतां आली नाहीं म्हणजे त्यांना नाहीं वाटतं त्रास व्हायचा?"

"खरं आहे तुमचं म्हणणं."

"तर मग पुष्कळांच्या साठीं एकानं त्रास सोसायला हवा. नाहीं का?"

"हो."

तुकारामबावांनीं कांट्या उपटून टाकल्या! वाट मोकळी केली. प्रदक्षिणा पुरी केली, अन् मग देवळांत जाऊन भजन करायला लागले.

मंबाजीला हें कळलं. मग काय! भुताच्या हातीं कोलीत! तरातरा निघाला देवळाकडे. त्या बाभळीच्या फांदोऱ्यांतली एक फांदोरी उचलून घेतलीन् हातांत. तोंडानं शिव्यांचा भडिमार.

" मीं लावलेल्या कांव्या उपटल्या ! फार माजलाय् हा तुक्या ! नुसता पोळ सुटलाय्. त्याला वाटतं, आपण कीर्तनं करतों. आभाळाला हात लागले आपले ! पण मजा कुठं माहीत आहे म्हणावं ! लोक पायां पडतात, म्हणून फार शेफारलाय् ! आतां शिकवतों त्याला ! "

देवळांत पोंचला तो. तिथं तुकोबा हरिरंगांत रंगले होते. त्यांची बकोटी धरून उचललंन् त्यांना. अन् विचारलंन्,

" ए बैलोबा ! कांव्या कुणीं उपटल्या ? "

" मीं उपटल्या. "

" पुनः निर्लज्जासारखा मीं उपटल्या म्हणतोस ? लाज नाहीं वाटत ? "

" मग आतां काय खोटं बोलूं ? मीं उपटल्या नाहीं म्हणूं ? "

" गाढवा, वर तोंड करून बोलतोस पुनः ? थांब हां ! आतां तुला प्रायश्चित्त देतों ! "

अन् मग हातांत बाभळीची फांदोरी होती, तिनंच केलीन् बडवायला सुरुवात ! ढोरागुरासारखा मारतोय् ! लागेल तिथं लागेल ! तोंडावर, पोटावर, पाठीवर, पायांवर ! त्या बाभळीच्या फांदोरीला कांटे. एकेक कांटा हा एवढा. करंगळीच्या मापाचा. भराभर कांटे शिरताहेत तुकोबांच्या अंगांत.

अन् तुकोबा ?

मुखानं चालला आहे. हरिनामाचा गजर.

" श्रीहरि ! मुकुंदा ! विठ्ठल ! पांडुरंगा ! मला हा मार सहन करायचं सामर्थ्य दे ! काय वाटेल तें झालं, तरी मी तुझे पाय सोडणार नाहीं ! "

**न सोडीं न सोडीं न सोडीं ।**

**विठोबा चरण न सोडीं ॥**

“चांगलं करतो आहेस देवा! माझ्या क्षमेचा अंत पाहतो आहेस!

बरवें बरवें केलें विठोबा बरवें।
पाहोनी अंत क्षमा अंगीं कांटीवरी माराविलें॥

“पण सांवळ्या, मीहि परीक्षेला उतरलों तुझ्या कृपेनं! राग आला नाहीं बरं का मला! तूंच सोडवून घेतलंस मला त्याच्या तडाख्यांतून!

तुका म्हणे क्रोधाहातीं। सोडवूनि घेतलें रे॥

“श्रीहरि, जन्मभर हाच भाव, हीच भक्ति कायम राहूं दे!”

मारमार मारलंन् मंबाजीनं. हात दुखायला लागला तसा थांबला तो, अन् तोंडानं शिव्यांचा पट्टा सुरू झाला.

देवळाबाहेर ही गर्दी जमली होती. पण मंबाजीला सांवरायचा धीर कांहीं कुणाच्यानं करवेना. एक पोरगं कळवळलं. तें धांवत गेलं घरीं. आवली पोरांना आंघोळी घालीत होती. तिला हांक मारून पोरगं म्हणालं,

“आवलीकाकी!”

“काय रे?”

“तुकोबांना लई मारलं!”

पटकन् आवली उभी राहिली.

“कुणी रे?”

“मंबाजीबुवानं! रावळांत!”

वाघिणीसारखी आवली निघाली. ती येत्येय् हा सुगावा लागला मंबाजीला, तसा त्यानं पाय मागं घेतला, अन् घाईघाईनं मठांत पावता झाला!

बावा देवापुढं डोकं टेकून बसले होते. मुखानं चाललं होतं चिंतन.

जमलेल्या मंडळींनं आवलीला काय झालं तें सांगितलें. ती त्यांना म्हणाली,

" तो रानदांडगा या देवमाणसाला मारीत होता, तेव्हां तुमची एकाची छाती झाली नाहीं ना त्याला अडवायची ? "

" खरं आहे, आवल्ये ! पण तो मंबाजीबुवा ! त्याच्या अंगांत देव येतो ! "

" देव येतो म्हणे देव ! थांब म्हणावं मेल्या, यांना घरीं नेत्यें, अन् मग खेटरानं पूजा करत्यें तुझ्या देवाची ! "

तिनं तुकोबांना उठवलंन्. त्यांच्या सगळ्या अंगांतून रक्ताचे पाट चालले होते ! आवली खळाखळा रडायला लागली. तुकोबांना म्हणाली,

" चला घरीं ! "

हळूहळू तुकोबांना घरीं नेलंन् तिनं. तिथं नाचकणानं अंगांतले सगळे कांटे काढून टाकलेन्. अंगाला लोणी अन् हळद लावलीन्. गरम गरम आंबील करून खाऊं घालून अंथरूण घालून त्यावर झोंपवलंन्. गोधडी पांघुरविलीन्, अन् मग बाहेर पडली.

बाबा म्हणाले,

" आवल्ये, कुठं जात्येस ? "

" मंबाजीबुवाची पूजा करायला. "

" ऐक आवल्ये ! जाऊं नकोस ! "

" तुम्ही मुकाट्यानं झोंपा बघूं ! आतां अंथरुणावरून उठायचं नाहीं ! "

" अग पण आवल्ये–"

" पण नाहीं नि कांहीं नाहीं. माझं मी पाहून घेत्यें ! "

आवलीनं पदर खोंचला कमरेला, अन् शिरली मंबाजीच्या मठांत.

मंबाजीनं तिचा तो अवतार पाहिला, तसा मठाच्या खोलींत शिरला! दार घट्ट लावून घेतलंन्!

हें आवलीनं पाहिलंन्. तशी मग त्याला तिनं खूप शिव्याशाप दिलेन्. मग शेवटीं म्हणाली,

"भ्याड! पळपुटा! बांगड्या भर हातांत! आतां बाहेर सांपडतास तर भली खेटरपूजा केली असती! आतां पुनः तर नांव घे यांचं, न मेल्या तुझं कांडात काढीन, तर नांवाची आवलीच नव्हे मी!"

बावा संध्याकाळवेरीं घरीं झोंपून राहिले. संध्याकाळ झाली, तसे ते उठले. रावळांत आले. त्यांनीं भजन सुरू केलं. मंडळी जमली. पण बावांना बरं वाटेना. त्यांनीं वीणा दुसऱ्याजवळ दिला.

अन् आपण नीट गेले मंबाजीच्या मठाकडे!

मंबाजी झोंपला होता धुनीजवळ. तुकोबा तिथं पोंचले, अन् त्याचे हातपाय चेपायला लागले, मंबाजी पट्दिशीं जागा झाला. त्यानं विचारलं,

"कोण आहे?"

"मी तुका वाणी!"

"तुका वाणी?"

"हो बुवा, सकाळी मला मारतांना तुम्हांला कष्ट झाले! माझं अंग दगडासारखं. तुमचं अंग मऊमऊ! दुखत असतील हातपाय. म्हणून चेपायला आलोंय्."

आतां काय बोलणार मंबाजी? तुकोबा त्याला कीर्तनाला घेऊन गेले. मंबाजीला अगदीं मेल्याहून मेल्यासारखं झालं!

पण तुकोबांची कीर्ति वाढलेली त्याला कांहीं बरी वाटेना. त्यानं आणखी एक प्रयत्न केलान्.

* * *

# १२. परीक्षा

देहूंत चांगलीं अन् वाईट—दोन्ही जातींचीं माणसं होतीं. जसे पुरुष तशा बाया. एक बाई वाईट चालीची होती. नट्टापट्टा करायची. डोळ्यांत काजळ घालायची. रस्त्यानं चालणाराकडे डोळे मिचकावून पाहायची.

ती मंबाजीच्या मठांत जायची. तिला मंबाजीनं फितवलंन्, शिकवलंन्.

एकदां संध्याकाळीं रावळांत बाबा एकटेच भजन करीत बसले होते. लक्ष श्रीहरीच्या मूर्तीकडे लागलं होतं. ते म्हणत होते,

"माझा श्रीहरी राजस सुकुमार आहे. तोः मदनाचा पुतळा आहे. त्याच्या तेजापुढं चंद्रसूर्य कोमेजले! त्याच्या भाळीं चंदन माखलं आहे. त्यावर कस्तुरीचा टिळा आहे. गळ्यांत वैजयंती माळ रुळत्ये आहे. तो पितांबर नेसला आहे. त्याचा रंग सोनसळा आहे. असा तो माझा घननीळ सांवळा मला फार आवडतो. बायांनो, सगळ्या एका बाजूला सरा. मला त्याला आलिंगन देऊं द्या. मला आतां धीर धरवत नाहीं."

राजस सुकुमार मदनाचा पुतळा।
रविशशिकळा लोपलिया॥
कस्तुरी मळवट चंदनाची उटी।
रुळे माळ कंठीं वैजयंती॥
कासे सोनसळा पांघुरे पाटोळा।
घननीळ सांवळा बाइयांनो॥
सकळही तुम्ही व्हा गे एक सवा।
तुका म्हणे जीवा धीर नाहीं॥

तोंच पैंजणांचा छुमछुम आवाज ऐकूं आला. तुकोबांनीं विचारलं, "कोण आहे?"

" मी आहें ! " लाजत लाजत उत्तर आलं.

" तुम्ही कोण ? "

" मी मंजिरी ! "

" काय हवंय् तुम्हांला ? "

" कांहीं नाहीं–पण–"

" मग कशाला आलांत बाई ? "

" नाहीं–मला तुम्ही आवडतां ! "

बावांनीं हसून विचारलं.

" मी आवडतों ? "

" हो ! "

" माझ्यांत काय आहे बाई आवडण्यासारखं? रोडकं शरीर! फाटके कपडे ! ही अवकळा कशी आवडली बाई तुम्हांला ? "

" पण तुम्ही फार चांगलं भजन करतां ! "

" कुणाचं भजन, बाई ? "

" देवाचं ! "

" देवाचं भजन तुम्हांला आवडतं ! "

" हो ! मी म्हणूं तुमचा अभंग ? "

" म्हणा ना ! "

मग मंजिरीनं बावांचा अभंग म्हटला. तिचा गोड गळा. तुकोबा रंगून गेले. ते नाचायला लागले. मंजिरी म्हणाली,

" आवडलं ना तुम्हांला ? "

" हो ! फार छान भजन म्हटलंत तुम्हीं ! "

" मग मी आवडल्यें ना तुम्हांला ! "

" माझ्या श्रीहरीचा प्रत्येक भक्त मला आवडतो ! "

" तुमचं प्रेम बसलं ना माझ्यावर ? "

" हो आई ! तूंहि या तुझ्या लेंकरावर प्रेम कर ! "

गोंधळली मंजिरी. ती म्हणाली,

"नाहीं नाहीं. तसं नव्हे."

"मग कसं मातुश्री?"

लाडावून पुढं सरत मंजिरी म्हणाली,

"असं हो काय करतां? मला किनई तुम्ही फार फार आवडतां."

तुकोबांची मुद्रा गंभीर झाली. ते म्हणाले,

"आई, तूं माझ्यावर प्रेम करत्येस, पण मला तें खरं वाटत नाहीं. मी तुझं लेंकरूं आहे. मला ओळखलं नाहींस तूं. माझं लग्न झालं आहे. आवलीखेरीज इतर सगळ्या स्त्रिया मला मातेसमान आहेत! असं भलतं काय बोलत्येस आई! तुझं हें पतन पाहून मला फार कष्ट होतात. जा तूं आई, घरीं जा. या लेंकरावर दया असूं दे!"

**पराविया नारी रखुमाईसमान।**
**गेलें हें नेमून ठाईंचेंची॥**
**जाईं वो तूं माते न करीं सायास।**
**आम्ही विष्णुदास तैसे न हों॥**
**न साहवे मज तुझें हें पतन।**
**नको हें वचन दुष्ट वदों॥**

मंजिरीनं मान खालीं घातली. ती रडायला लागली. तुकोबांना लांबूनच नमस्कार केलान् तिनं अन् तिथून मंबाजीच्या मठांत गेली. तो तिची वाटच पाहात होता.

"झालं काम?"

"नाहीं झालं!"

"कां नाहीं झालं?"

अनुक्रम
विभाग
नों. दि.

कसल्या देवमाणसाकडे धाडलंत मला ? जळलं तुमचं लक्षण तें !" ...

मंबाजी दांत ओठ खात म्हणाला,

"तूंहि भाळलीस ना त्याला ? ठीक आहे ! तूं नाहींस तर तुझा आजोबा दुसरा !"

* * *

## १३. उदकामाजीं वह्या

पुण्याहून नऊ मैलांवर वाघोली गांव. तिथं एक विद्वान् ब्राह्मण राहायचे. रामेश्वरभट त्यांचं नांव. मोठा कर्मठ माणूस. रोजची स्नान-संध्या अन् ब्रह्मयज्ञ चुकायचा नाहीं. त्यांच्या विद्वत्तेची कीर्ति लांबपर्यंत पसरलेली.

मंबाजी उठला अन् रामेश्वरभटांकडे गेला. त्यांनीं विचारलं,

"कां येणं केलंत ?"

"जीव देण्यासाठीं मुहूर्त सांगा !"

"जीव कां देतां ?"

"मग काय करूं ? धर्म पार रसातळाला गेला !"

"काय झालं ?"

"अहो, आमच्या गांवचा तुक्या वाणी कीर्तन करतो !"

"मग ? त्यांत बिघडलं कुठं ?"

"वेदांचा अर्थ प्राकृत भाषेंत सांगतो !"

"असं ?"

"हो ना ! तो म्हणतो, वेदांचा अर्थ आम्हांलाच माहीत आहे ! बाकीचे नुसते ओझीं वाहणारे बैल आहेत !"

"काय ?"

“अहो, मी त्याचा अभंगच म्हणून दाखवतों.”

वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा ।
येरांनीं वहावा भार माथा ॥
खादल्याची गोडी देखिल्यासी नाहीं ।
भार धन वाही मजुरीचें ॥

रामेश्वरभट संतापले. ते म्हणाले,

“अन् तुम्ही खुशाल त्याला ही बडबड करूं देतां?”

“मग काय करूं?”

“त्याला म्हणायचं कीर्तन करीत जाऊं नकोस.”

“भले, तिथं आमचं कोण ऐकतोय्? अहो, देहूचा कुलकर्णी महादाजीपंत, चिखलीचा मल्हारपंत, तळेगांवचा गंगाराम मवाळ, पुण्याचा कोंडो लोहोकरा, अशी ब्राह्मणमंडळी त्याच्या नादीं लागली आहेत. पायां काय पडतात! लोटांगणं काय घालतात!”

रामेश्वरभट उठले. मंबाजीला घेऊन पुण्याला गेले. पुणं हें सुभ्याचं गांव. तिथं सुभेदाराला भेटले ते दोघे. सुभेदारावर रामेश्वरभटांचं वजन. तो म्हणाला,

“मी काय करूं तें सांगा.”

“एक पत्र पाठवा गांवच्या पाटलाला. त्याला म्हणावं, तुक्याला अभंग करणं बंद करायला सांग. अन् गांवांतून हांकून दे म्हणावं!”

“पत्र घेऊन जासूद देहूला आला. पाटलाला जोहार करून त्यानं पत्र दिलंन्. पाटलानं लगेच तुकोबांना बोलावलंन्. चांडाळचौकडी होतीच शेजारीं. पाटलानं. तुकोबांना सुभेदाराचं पत्र वाचून दाखवलं. तुकोबा म्हणाले,

“मग आतां मी काय करूं?”

“काय वाटेल तें कर. शेण खायला सांगितलं होतं कुणीं! कीर्तनं काय करतो! गातो काय! नाचतो काय! चांगलं दुकान होतं.

व्यापार करायचा, पैसा मिळवायचा, बायकापोरांना खाऊं घालायचं, आपण खायचं. तें टाकून हरीहरी करीत नाचायला लागले. आतां भोगा त्याचीं फळं."

उदास तुकारामबावा घरीं परतले. आवलीनं विचारलंन्,

"कां हो? काय झालं?"

"आवले, धड प्रपंचहि झाला नाहीं! धड परमार्थहि नाहीं! नी दोन्हींकडे चोर ठरलों ग!"

**देव ना संसार। तुका दोहींकडे चोर॥**

"हें पाहा, साधं सरळ बोला. त्या तुमच्या अभंगांत बोलायचीं माणसं दुसरीं आहेत कीं बख्खळ! इथं आमच्याशीं तरी धड बोलत चला!"

"काय सांगूं आवले! मी एकटा सांपडलों यांना! म्हणून यांनीं माझा घात केला ग!"

"घात? काय झालं धड सांगा तरी!"

"म्हणतात, तुक्या चवी सोडून भलतंसलतं वागायला लागला! दिवाणांत पोंचले हे लोक. तिथून हुकूम आणला. मला गांवांत राहूं देत नाहींत. पाटील, गांवचीं भलीं माणसं, सगळे रागावले माझ्यावर. आतां कुठं जाऊं? काय करूं?"

**काय बा करावें कोणीकडे जावें।**
**गांवांत रहावें कवण्या परी॥**
**कोपला पाटील गांवांतले लोक।**
**आतां मज भीक कोण घाली॥**
**आतां येणें चवी सांडिली म्हणती।**
**निवाडा करीती दिवाणांत॥**
**भल्या लोकीं यांस सांगितली मात।**
**केला माझा घात दुर्बळाचा॥**

" हे भले लोक कोण आहेत ? कळूं द्या तरी ! "

" वाघोलीचे रामेश्वरभट ! "

" ते काय म्हणतात ? "

" ते म्हणतात कीर्तन करूं नकोस ! "

" मग काय म्हणावं कुटाळक्या करूं ? दरोडे घालूं ? करूं तरी काय ? जाऊन विचारा तरी ! "

तुकोबा वाघोलीला पोंचले. रामेश्वरभट संध्या करून उठले होते. तुकोबांनीं त्यांच्यापुढें लोटांगण घातलं. रामेश्वरभटांना आश्चर्य वाटलं. त्यांनीं विचारलं,

" कोण तुम्ही ? "

" मी ? मी पामर ! "

" नांव काय ? गांव कोण ? "

" देहूचा तुका वाणी ! "

रामेश्वरभटांनीं ओळखलं. तुकोबांची सौम्य मुद्रा पाहिली त्यांनीं. मनांत तर ते सर्दच झाले. पण आतां करतां काय ! आपणच फिर्याद केलेली ! मग ते म्हणाले,

" तूं कीर्तन करतोस ? वेदान्त सांगतोस ? "

" मी कोण सांगणार ! मी कोण कीर्तनं करणार ? ही सत्ता त्या हरीची आहे. हें शरीर त्याच्या आज्ञेनं चालतं. तो बोलायला लावतो. "

चाले हें शरीर कोणाचिये सत्ते ।
कोण बोलवितें देवावीण ।।

" तुला देव बोलायला लावतो ? "

" मला एकट्याला ? नव्हे देवा ! सगळ्या जगाला. माणसंच काय, पण रानचीं पांखरांहि गोड गोड बोलतात. त्यांना बोलावणारा धनी तो आहे !

साळुंकी मंजुळ बोलतसे वाणी ।
बोलविता धणी वेगळाची ॥

"मीं पामरानं काय बोलावं? विश्वंभर पांडुरंग बोलवितो, म्हणून मी बोलतों!"

काय म्यां पामरें बोलावीं उत्तरें ।
परि त्या विश्वंभरें बोलविलें ॥

रामेश्वरभट कातावले. तुकोबा बरोबर बोलत होते. खोटं म्हणवेना. खरं आहे, हें कबूलहि करवेना! शेवटीं तुकोबांनीं विचारलं,

"मग देवा, मी काय करूं आतां?"

"मी देव आहें, यावर तुझा विश्वास आहे का?"

"मी खोटं बोलायचा नाहीं."

"तर मग आतां अभंग करीत जाऊं नकोस!"

"अन् आतांपर्यंत केले ते?"

"दे इन्द्रायणींत टाकून!"

"ठीक आहे. आपली आज्ञा पाळीन मी."

तुकोबा परतले. वाईट वाटलं. खेद झाला. एवढे दिवस अभंग बोलत गेलों, श्रीहरीच्या आज्ञेनं. आतां तें सगळं इन्द्रायणींत टाकून द्यायला हवं. दिलंच पाहिजे. शब्द गेलाय् आपला.

घरीं आले तुकोबा. बासनांत बांधून ठेवलेल्या वह्या बाहेर काढल्या. डोक्यावर घेतल्या. डोहाकडे निघाले. आवली गेली होती पाण्याला. वाटेंत भेटली ती. आश्चर्यानं तिनं विचारलंन्,

"अहो, कुठं निघालांत?"

"डोहाकडे."

"कशाला?"

"या वह्या डोहांत टाकायला सांगितलंय्, आवले."

“ अहो, तुम्हांला वेड लागलं का काय ? कुणीं सांगितलं हें ? ”

“ पृथ्वीवरच्या देवानं. रामेश्वरभटांनीं ! ”

“ जळलं त्याचं तोंड—त्या देवाचं. त्याला मेल्याला काय होतंय् सांगायला ? मी नाहीं टाकूं द्यायची ! ”

आवलीनं पाण्याचा हंडा टाकला खालीं अन् पोथ्यांना हात घातला. ही गर्दी जमली गंमत पाहायला. टवाळ म्हणायला लागले,

“ भली झाली लेकाची ! ”

“ नाहीं तर काय ? मिशांना तूप लावून कीर्तनं करीत होता ! ”

“ आतां घ्या म्हणावं ! ”

“ प्रपंचहि नासला, परमार्थहि पाण्यांत बुडाला ! ”

तुकोबांचे भक्त होते देहूंत, तेहि सगळे आडवे आले. काकुळत करायला लागले. म्हणाले,

“ बावा, आमचं ऐका ! या पोथ्या नका बुडवूं ! मग आम्ही कशाच्या आधारावर जगायचं ? ”

पण बावांनीं एकाचंहि ऐकलं नाहीं.

ते पोथ्या घेऊन डोहावर गेले. पोथ्यांवर चांगले जड दगड बांधले. पाण्यांत शिरले ते. डोळ्यांतून आंसवं गळत होतीं. म्हणाले,

“ श्रीहरी, तुझी इच्छा ! तूं बोलवलेले हे अभंग ! तूंच बुडवायला लावतो आहेस ! लाव वापडा ! माझ्या अंतरांत तळमळ होत्येय् रे ! पण माझ्या मनांतले ते बोल तूं ऐकत नाहींस. मग आतां मी उगीच भूस उपणीत कशाला बसूं ?

**नाहीं आइकत तुम्ही माझे बोल ।**
**कासया हें फोल उपणूं भूस ॥**

“ हें तुमचंच तुम्हांला अर्पण असूं दे.”

दिलं गांठोडं सोडून पाण्यांत. उदास बावा परतले. कांठावर एक होतं पिंपरीचं झाड. त्याच्या खालीं बसले ते. आवली म्हणाली,

" आतां घरीं चला कीं. बुडवल्यात वह्या एकदांच्या, पण भाकरहि खायची नाहीं वाटतं ? "

" नाहीं आवले. घरीं परतून काय करूं आतां ? "

" मग काय करणार ? "

" इथं पडून राहणार. "

" खाणंपिणं ? "

" आतां खाणं नाहीं, पिणं नाहीं. श्रीहरीनं वह्या बुडवायला लावल्य आतां या देहाचंहि त्याला काय मनास येईल तें करूं दे. "

एका दगडावर बावा बसून राहिले. डोळ्यांवाटें आंसवांचा पूर चाललाय्. मुखानं त्या श्रीहरीचं स्मरण चाललंय्. कुणाशीं बोलणं नाहीं, चालणं नाहीं.

संध्याकाळीं आवली भाकरी घेऊन आली. आग्रहानं म्हणाली,

" अहो, घ्या कीं. एकच घांस घ्या. "

बाबांनीं डोळे मिटून घेतले.

" घ्या ना हो ! तुम्ही जेवणार नाहीं मग मी कशी जेऊं ? पोरं कशीं जेवतील ? "

पण बावांनीं मन कठोर केलं होतं. निश्चक्र उपोषण सुरू केलं त्यांनीं. काय होईल तें होवो, आतां हें शरीर ठेवायचं नाहीं. हे प्राण राखायचे नाहींत.

डोळ्यांतलीं आंसवं पुसून आवली म्हणाली,

" ठीक आहे. नका खाऊं. नका बोलूं. मीहि पोरांना घेऊन इथं बसतें तुमच्याजवळ. "

पोरं अन् आवलीहि बावांच्याजवळ बसलीं.

एक दिवस गेला. दोन गेले, तीन गेले, दहा गेले, बारा गेले, अन् तेरावा उजाडल .

देवानं तेरा दिवस आपल्या भक्ताची परीक्षा पाहिली. बावांचं शरीर बेशुद्ध झाल्यागत वाटे. श्वास पार मावळला. हालणं चालणं बंद झालं. दुष्टांना वाटलं, बरी पीडा गेली. भाविकांना वाटलं, आमचा आधार तुटला!

अन् चौदाव्या दिवशीं श्रीहरि बाळरूपानं आले. तुकोबांच्या पाठीवर आपला हात ठेवून ते म्हणाले,

"तुकोबा, उठा. मी आलों आहें."

तुकोबांनीं डोळे उघडून पाहिलं. श्रीहरीचं तें गोजिरवाणं रूप पाहातांच त्यांनीं त्याच्या पायीं मिठी मारली. देव बोलला,

"तुकोबा, वह्या बुडल्या नाहींत!"

"मग?"

"त्या पाहा. वर तरंगताहेत. मी बोलवलेले बोल. ते बुडतील कसे?"

बावांनीं पाहिलं तों खरंच.

तेवढ्यांत गंगाराम मवाळाला दृष्टान्त झाला होता. तेहि लोक धांवत आले. चारसहा जणांनीं पाण्यांत उड्या घालून वह्या बाहेर काढल्या! मग काय आनंद! केवढा संतोष! भजनाची एकच घाई! टाळ, मृदंग, वीणा, एकच गदारोळ उसळला!

बावांच्या डोळ्यांतून घळांघळां आंसवं पाझरायला लागलीं! ते म्हणाले,

"पांडुरंगा! तुझा किती अंत पाहिला रे मीं! केवढा अन्याय झाला माझ्याकडून! लोक मला बोलले, तेवढ्यावरून मी तेरा दिवस इथं पडून राहिलों. तुला सांकडं घातलं. अन् तूंहि केवढं कौतुक केलंस! तेरा दिवस पाण्यांत वह्या राखीत राहिलास. जनांचा अपवाद चुकवलास. आपल्या ब्रीदाला जागलास!

थोर अन्याय केला । तुझा अंत म्यां पाहिला ।
जनाचिया बोला । साठीं चित्त क्षोभविलें ॥
भागविलासी केला शीण । अधम मी यातिहीन ।
झांकूनि लोचन । तेरा दिवस राहिलों ॥
उदकीं राखिले कागद । चुकविला जनवाद ।
तुका म्हणे ब्रीद । साच केलें आपुलें ॥
चुकी झाली एकवेळां । मजपासोनि चांडाळा ।
उभें करोनि जळा । माझीं वह्या राखिल्या ॥

भक्तांना खूप आनंद झाला. दुष्टांचीं तोंडें काळीं झालीं !

* * *

## १४. जयजयकार

बावांची कीर्त चहूंकडे गर्जायला लागली. त्यांच्या कीर्तनाला खूप गर्दी जमायला लागली. भाविक तर यायचेच. पण अगोदर विरोध करणारेहि बावांच्या पायांवर डोकीं टेकायला लागले. अगदीं रामेश्वरभट सुद्धां !

झालं असं, कीं रामेश्वरभट निघाले. पुण्यांतल्या नागनाथाच्या दर्शनाला. वाटेंत एका विहिरींत त्यांनीं केली आंघोळ. तर अंगाचा असा भडका झाला, कीं पुसूं नका ! कांहीं केल्या शांत होईना. वैद्य झाले. औषधं झालीं.

शेवटीं रामेश्वरभट आळंदीला आले. तिथं त्यांनीं पाण्यांत बसून ज्ञानोबांना सांकडं घातलं. ज्ञानोबा त्यांच्या स्वप्नांत आले. ते म्हणाले,

"तूं तुकोबांना दुखवलंस, म्हणून हें असं झालं !"

"मग आतां काय करूं ?"

"तुकोबांना शरण जा !"

रामेश्वरभट निघाले! देहूला येऊन तुकोबांचे पाय धरले त्यांनीं. उठवलं बावांनीं. ते म्हणाले,

"हें भलतेंच काय करतां देवा?"

"माझ्या अपराधाचा दंड भोगतोंय्!"

"कसला अपराध? कसला दंड?"

रामेश्वरभटांनीं सगळं सांगितलं. बावा म्हणाले,

"देवा, चित्त शुद्ध राखावं, म्हणजे मग दुःखहि सुख देणारं होतं. आगीच्या ज्वाळा शांत होतात."

दुःख तें येईल सर्वसुखफळ।
होतील शीतळ अग्निज्वाळा॥

रामेश्वरभटांची आग शांत झाली. तेव्हांपासून ते बावांच्या कीर्तनांत टाळ धरायला लागले.

नाना प्रकारची मंडळी बावांकडे येत. बावांनीं त्यांना भक्तिमार्गाला लावावं. त्यांनीं म्हणावं,

"गडे हो! चित्त शुद्ध करावं. श्रीहरीचं नाम घ्यावं. तें अगदीं सोपं आहे. दुसऱ्याचे दोष चिवडीत बसूं नये. चांगलं गोड बोलावं. परोपकार करीत जावा. असं केलं म्हणजे देव कृपा करतो."

भावें गावें गीत। शुद्ध करोनियां चित्त॥
जरि तुज व्हावा देव। तरि हा सुलभ उपाव॥
आणिकांचे कानीं। गुणदोष मना नाणीं॥
तुका म्हणे फार। थोडा करीं उपकार॥

बावांच्या कीर्तनाला सगळे येत. शेतकरी येत, व्यापारी येत, शिलेदारहि येत. ते बावांना म्हणत,

"महाराज, आम्हांला कांहीं तरी सांगा!"

बावा बोलत,

तुम्हांला काय सांगूं? तळहातावर शिर घेऊन झुंजांत शिरणारीं माणसं तुम्ही. पण एकदां भांडायचं ठरलं, कीं मग जीवाचं कौतुक बाळगूं नये. भय पुढं डोकावतां उपेगाचं नाहीं. मारामारी करतांना जिवाची शर्थ करावी. पट्टीचा शूर म्हणवावं. त्यांतच माणूसजन्माचं सार्थक आहे."

भांडणाचि झालें। मग जीवाचें काय आलें ।।
येऊं नेदावी पुढती। भयाची ते आडजाती ।।
करितां भरोवरी। कांहीं न ठेवावी उरी ।।
तुका म्हणे शूर। व्हावें धुरेसीच धूर ।।

असा उदंड सोहोळा चालला. आषाढी–कार्तिकीला पंढरीची वारी तर सुरूच होती. बावा वीणा घेऊन पंढरीला जात. त्यांच्या मागं वारकऱ्यांचा भला थोरला मेळा. वाटेंत बावांचीं कीर्तनं होत. ते त्या कीर्तनांतून सांगत,

गडे हो,

"आमच्याबरोबर या. आम्ही कंबरा बांधून कळिकाळाशीं लढायला चाललों आहोंत. भवसिंधूवरून भली मोठी पायवाट केली आहे."

"या! सारे या. लहान या, थोर या, भलत्या जातीचे या, नारी या, नर या! कुणीहि कसलाहि विचार करूं नका."

"इथं सगळ्यांना जागा आहे. श्रीहरीच्या नामाचा शिक्का–नाणीं मी वांटीत चाललों आहें. या. तीं लुटा. दोन्ही दोन्ही हातांनीं लुटा!"

कास घालोनी बळकट।
झालों कळिकाळावरि नीट।
केली पायवाट।
भवसिंधु वरोनी ।।

या रे या रे लहान थोर ।
याती भलते नारी नर ॥
करावा विचार ।
न लगे चिंता कवणासी ॥
एकंदर सिक्का ।
पाठविला इहलोका ।
आलों म्हणे तुका ॥
मी नामाचा धारक ॥

अन् पंढरीला पोंचल्यावरची मजा तर विचारूंच नका! तिथं वाळवंटांत वैष्णवांचा खेळ मांडला जाई. सगळे गात, नाचत. एकमेकांच्या पायां पडत. मुखानं नामाचा गजर. अन् वैष्णवहि कसे? एक एकाहून बळी! गोपीचंदनाची उटी. तुळशीच्या माळा. टाळ-मृदंगांचा धुमधुमाट. तिथं कुणाला अभिमान नाहीं. कुणाला ताठा नाहीं. कोणी जातीचा मोठेपणा मिरवीत नाहीं. सगळ्यांचीं मनं अगदीं लोण्यासारखीं झालेलीं. सारखा हरिनामाचा जयजयकार चालला आहे. आकाश त्या नादानं गर्जतं आहे!

खेळ मांडियेला वाळवंटीं घाई ।
नाचति वैष्णव भाई रे ॥
क्रोध अभिमान केला पावटणी ।
एक एकां लागती पायीं रे ॥
गोपीचंदन उटी तुळसीच्या माळा ।
हार मिरविती गळां रे ॥
टाळमृदंगघाई पुष्पांचा वरुषाव ।
अनुपम्य सुखसोहोळा रे ॥
वर्ण अभिमान विसरलीं याती ।
एक एकां लोटांगणीं जाती रे ॥

होतो जयजयकार गर्जत अंबर ।
मातले वैष्णव वीर रे ॥
तुका म्हणे सोपी केली पायवाट ।
तरावया भवसागर रे ॥

असा भक्तीचा सुगंध चहूंकडे घुमायला लागला. सगळा महाराष्ट्र त्यामुळं पवित्र झाला !

* * *

## १५. दिवट्या छत्री घोडे

बावांची ही कीर्त छत्रपति शिवाजी राजांच्या कानीं गेली. त्यांना वाटलं, आपल्या राज्यांत एवढा मोठा साधु ! आपण त्याची कांहीं तरी सेवा केली पाहिजे. म्हणून त्यांनीं पालखी, छत्री, घोडा, अबदागीर, एक ताटभर मोहोरा, असा नजराणा धाडला बावांकडे देहूला.

बावा घरीं नव्हते. शिवरायांकडली मंडळी आली हें सगळं घेऊन. त्यांनीं विचारलं,

" तुकोबा इथंच का राहतात ? "

सरकारी माणसं पाहून गर्दी जमली. एक पोरगं घरीं पळालं तुकोबांच्या. त्यानं आवलीला सांगितलंन्,

" आवलीकाकी ! "

" काय रे ! "

" माणसं आल्येंत ! बावांना पकडायला ! "

त्या पोराला काय कळे ! त्यानं आपलं आलं मनाला तें सांगून टाकलंन्. आवलीनं हातचं काम दिलंन् टाकून. पदर खोंचलान् कंबरेला; त्या पोराला म्हणाली,

" चल बघूं! बघत्यें एकेका पकडणाराचं पाणी! "

ती घरांतून बाहेर पडत्येय् तोंवर शिवरायाचीं माणसं दारीं उभीं राहिलीं. त्यांनीं विचारलं,

" बावा कुठं आहेत? "

" करायचे आहेत काय बावा! मी आहें ना! मला पकडा अगोदर, नी मग त्यांना हात लावा. चालले मोठे तरवारी बांधून त्यांना पकडायला! त्यांनीं काय खाल्लं आहे रे तुमचं? देवमाणूस बिचारा. कुणाच्या अध्यांत का मध्यांत! मनाला येईल त्याला पकडायला कांहीं मोगलाई नाहीं आहे म्हटलं! हात लावा बघूं त्यांना! मग सांगत्यें एकेकाला काय तें! "

माणसं लागलीं हसायला. तें पाहून आवली आणखीनच चिडली. म्हणाली,

" दांत काढताहेत पाहा मेले निलाजऱ्यासारखे! "

" अहो आईसाहेब, आम्ही तुकारामबावांना पकडायला आलों, असं कुणीं सांगितलं तुम्हांला? "

" मग कशाला आलांत? "

" आम्ही नजराणा आणलाय् राजांकडून! "

" नजराणा! "

" हो! आणा रे तें सामान! "

मग सगळं सामान आणून ठेवलं समोर. आवलीला असं आश्चर्य वाटलं! ती म्हणाली,

" हें सगळं तुम्हीं यांना आणलं आहे? "

" हो ना! "

" हें सगळं? ही अबदागीर, या मोहरा, हा शालू— "

" हो! हें सगळं! "

अन् मग आवलीला असा कांहीं पश्चात्ताप झाला आहे! डोळे पुशीत ती म्हणाली,

" बाबांनो, उगीच बोलल्यें रे तुम्हांला. काय करूं ?. हें आमचं ध्यान. त्यांना सगळ्या जगाची काळजी. नाहीं काय ती आमची. दिवसभर लोकांचं दुखलंखुपलं पाहात अन् भजन करीत गांवभर हिंडतील. घरीं काडीचं लक्ष नाहीं. सारखी मनांत धास्ती वाटत्ये. कुठं जाताहेत कोण जाणे. काय करताहेत कोण जाणे. राग मानूं नका बरं का. या बसा!"

तेवढयांत बावा घरीं आले. त्यांना पाहिल्याबरोबर सरदार उठले. नमस्कार करून ते म्हणाले,

" आम्ही शिवरायाकडून आलों."

" लांबून आलांत! थकलां असाल! आवले, यांना गूळपाणी दे ग."

" तें घेऊं नंतर–आपला प्रसाद म्हणून. पण छत्रपतींनीं आपली थोडीशी भेट पाठवली आहे."

" कसली भेट ?"

" आणा रे समोर."

त्या मंडळीनं तो सगळा सरंजाम बावांच्या समोर आणून मांडला. तो पाहून बावा हसून म्हणाले,

" हें मला धाडलंय् राजांनीं ?"

" हो महाराज!"

" मी याचं काय करूं ?"

" आपल्याला पालखी धाडली आहे, तींत बसतां येईल."

बावा मोठमोठ्यानं हसले. ते म्हणाले,

"ऐकलंस आवले, आपल्याला राजांनीं पालखी धाडली आहे. उद्यांपासून शेतांत कुणाकडे कामाला जातांना पालखींत बसून जायचं. तूं शेण्या वेंचायला पालखींतून जात जा."

मंडळी गडबडली. म्हणाली,

"तसं नव्हे महाराज."

"मग कसं? सांगा तरी. हें फाटकं धोतर, जुनं पागोटं, रोडकं शरीर, हें घेऊन मी पालखींत बसत जाऊं?"

"पण राजांनीं आपल्याला भेटीला बोलावलं आहे. आपलं दर्शन घ्यायचंय् त्यांना."

"दर्शन पंढरिनाथाचं घ्या म्हणावं. आमच्या दर्शनाच्या सोहो-ळ्याची धिंड कशाला काढतां?"

रोडके हातपाय दिसे अवकळा।
काय तो सोहळा दर्शनाचा ॥

"अन् मग हें आणलंय् तें-"

"घेऊन जा परत."

"सगळं? कमींत कमी घोडा तरी ठेवायचा होता—"

"देवा, हें सगळं घेऊन जा. मला कांहींहि उपयोग व्हायचा नाहीं याचा. घोडयाला खायला कुठून घालूं?"

दिवट्या छत्री घोडे।
हें तो बऱ्यांत न पडे ॥

"पण राजांना बरं वाटायचं नाहीं-"

"त्यांना आमचा निरोप सांगा. म्हणावं, श्रीहरीचं स्मरण करीत जा. गळ्यांत तुळशीमाळा घाला. एकादशीचं व्रत करीत जा. त्यानं मन शुद्ध राहातं. त्यानं आम्हांला संतोष होईल!"

आम्ही तेणें सुखी ।
म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखीं ॥
कंठीं मिरवा तुळशी ।
व्रत करा एकादशी ॥

मंडळी बिचारी सामान घेऊन परतली! शिवरायांना हें कळलं, तेव्हां त्यांना वाटलं, आपण स्वतः जाऊन भेटावं!

पुण्याजवळ लोहोगांव. तिथं बावांचीं कीर्तनं व्हायचीं. शिवबा तिथं बावांना भेटले. त्यांच्या पायांवर डोई ठेविली त्यांनीं. बावांनीं त्यांना क्षेम दिलं. कुशल विचारलं. रात्रीं कीर्तन होतं, तें ऐकायला राजे थांबले.

बावांनीं कीर्तनांत माणसानं वेव्हारांत कसं वागावं हें सांगितलं. वेव्हार करीत असतां लक्ष देवाकडे कसं ठेवावं, तें सांगितलं. शिवरायांना मोठं वरं वाटलं.

वारंवार शिवबा कीर्तनाला यायला लागले. एकदां ही खबर चाकणच्या मुसलमान सुभेदाराला कळली. त्यानं पाळत ठेवली, अन् एक हजार पठाण राजांना धरायला धाडले. पठाणांनीं देवळाला वेढा घातला. राजांना हें कळलं. त्यांनीं तुकोबांकडे पाहिलं. तुकोबांनीं पांडुरंगाचा धांवा केला. त्या देवळांतून जो माणूस बाहेर पडायचा, तो पठाणांना शिवाजीच वाटायचा! जितके पठाण, तितके शिवाजी! आतां पकडायचं तरी कुणाकुणाला! अन् अशा गडबडींत खरे शिवाजीराजे कधीं निसटून गेले तें कोणालाच कळलें नाहीं!

* * *

# १६. तुका जातो वैकुंठाला

बावांची वृत्ति विठ्ठलरूप व्हायला लागली. कधीं कधीं ते एकटेच उठायचे. भंडाऱ्या डोंगरावर जाऊन बसायचे. रात्रंदिवस आनंदी वृत्ति. एकटेच अभंग गायचे !

"माझं मरण मीं माझ्या डोळ्यांनीं पाहिलं ! खूप मजा ! चहूंकडे आनंदच आनंद !

**आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां ।**
**तो जाला सोहळा अनुपम्य ॥**
**आनंदें दाटलीं तिन्हीं त्रिभुवनें ।**
**सर्वात्मकपणें भोग झाला ॥**

"आतां जन्म घ्यायचा नाहीं. आतां मरायचं नाहीं. लाही पेरली तर कुठं रोप उगवतं का !

**बीज जाळुनि केली लाही ।**
**आम्हां जन्ममरण नाहीं ॥**

"उसाची साखर केली तिचा पुनः ऊस होतो का ? नाहीं ना ? मग आम्ही आतां मुक्त झालों; आम्हांला पुनः गर्भवास नाहीं !

**साकरेचा नोहे ऊस ।**
**आम्हां कैंचा गर्भवास ॥**

"आतां चहूंकडे आनंदच आनंद. आनंदाच्या डोहांत आनंदाचं पाणी. पोहोणाराहि आनंदच !

**आनंदाचे डोहीं आनंद तरंग ।**
**आनंदचि आंग आनंदाचें**

"सुख भेटायला आलं. कुणाला ? सुखाला. कशी मजा आहे !

आम्हांला सुखाचा ठेवा सांपडला आहे. आतां आनंदाची गणती करायला कुणाला बसवायचं ?"

सुख भेटों आलें सुखा ।
निधि सांपडला मुखा ।
तुका म्हणे लेखा ।
नाहीं आतां आनंदा ।।

जेवायचं खायचं भान कुणाला आहे? आवली बावांना जेवूं घातल्याशिवाय जेवायची नाहीं. तिनं त्यांना शोधून काढावं. भंडारा डोंगर देहूपासून तीन मैल. आवलीनं दुपारीं बारा वाजतां भाकरीची पाटी डोक्यावर देऊन भंडाऱ्यावर जावं. वाटेंत कांटे मोडायचे पायांत. तें सगळं त्या माउलीनं सहन करावं, अन् बावांना जेवायला वाढावं !

बावांनीं हसत हसत विचारावं,

"आवले, कां करतेस एवढं सगळं ?"

"तुम्हांला नाहीं कळायचं तें !"

"कां ?"

"त्याला बायकांचा जन्म घ्यावा लागतो !"

"आवले, आतां आपल्याला जन्म घ्यायचा नाहीं. कुणाचाच नाहीं."

"मग काय करायचं ?"

"आतां वैकुंठाला जायचं ! येत्येस वैकुंठाला ?"

आवलीनं फणकाऱ्यानं म्हणावं,

"जा तुम्हीच ! मला नाहीं वेळ ! माझी म्हैस व्यायल झाल्यै !"

"बघ बरं ! मग म्हणशील सांगितलं नाहीं म्हणून !"

"नाहीं म्हणायची !"

## “बरं आहे!”

शेवटीं शके १५७१ चा फाल्गुन उजाडला. पौर्णिमा उलटली. बावांनीं वैकुंठाचा ध्यास घेतला. कुणाला कांहीं कळेना. वैकुंठ म्हणजे काय! कुणीकडे जायचंय्!

आमांचा मुलगा. त्याचं नांव महादेव. तो होळीच्या धुळवडीनं अंग भरून आला. बावा त्याला म्हणाले,

“महादबा, वैकुंठाला येतां का!”

“नाय बा! मला अजून आंघोळ करायच्यैय्.”

“ठीक आहे. करा!”

काशी सासरहून आली. तिला बावांनीं विचारलं,

“काय काशीताई, वैकुंठाला चलतां का?”

“वैकुंठाला? मी नाहीं येत!”

“कां ग?”

“मामंजींनीं सांगितलंय्, पुनव झाल्याबरोबर परत ये म्हणून.”

बावा हसून म्हणाले,

ठीक आहे. जा!”

ज्याला ज्याला बावा विचारीत, तो तो कांहीं तरी सांगून नाहीं म्हणे. सगळ्यांना वाटे, हे कुठले जाताहेत वैकुंठाला! उगीच कांहींतरी विचारताहेत झालं! गंमत करीत असतील. वैकुंठ कुठं आहे कोण जाणे! तिथं कसले जाताहेत हे?

शेवटीं वद्य द्वितीया उजाडली. बावा सकाळीं आवलीला म्हणाले

“आवले, मग येणार काय?”

“कुठं?”

“वैकुंठाला!”

अनुक्रम विभाग क्रमांक दि. ग्रंथालय

“मला नाहीं घटकेची फुरसत! म्हशीचं शेण काढायचंय् अजून! अंगण सारवायचंय्! किती तरी कामं! तुम्हीच जा कुठं जातां ते!”

बावा हसले. त्यांच्या मनांतलं कुणालाच कळलं नाहीं.

ते भजनी-मंडळीला म्हणाले,

“चला मंडळी गोपाळपुरांत. भजन करूं!”

मंडळी गोपाळपुरांतल्या पिंपरीखालीं जमली. भजनाची धुमाळी सुरू झाली. बावा स्वतः वीणा घेऊन उभे राहिले. सगळी मंडळी हरिरंगांत रंगून गेली.

शेवटीं बावा अभंग म्हणूं लागले. नवे नवे अभंग. आजपर्यंतच्या अभंगाहून वेगळे. ते म्हणाले,

“मंडळी हो! आतां मी माझ्या माहेराला निघालों आहें! संतांच्या हातीं माझ्या मायबापांचा निरोप आला आहे. मी सारखी त्या वाटेकडे दृष्टि लावून बसलों आहें. माझे मायबाप येणार आहेत. ते स्वतः येणार आहेत! खरंच—खरंच येणार आहेत ते!

**आपुल्या माहेरा जाईन मी आतां।**
**निरोप या संतांहातीं आला॥**
**त्याचि पथें माझें लागलेंसे चित्त।**
**वाट पाहे नित्य माहेराची॥**
**तुका म्हणे आतां येतील न्यावया।**
**अंगें आपुलिया मायबाप॥**

“मंडळी हो! तुम्ही सगळे आतां मला निरोप द्या! चुकलों-माकलों असेन! क्षमा करा! आतां आपापल्या घरीं जा. मी माझ्या सख्याबरोबर जाईन. आतां आम्ही निघालों, कृपा असूं द्या.”

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

सकळांहीं माझी बोळवण करा ।
परतोनि घरा जावें तुम्हीं ॥
आतां मज जाणें प्राणेश्वरासवें ।
मी माझिया भावें अनुसरलों ॥
आम्ही जातों तुम्हीं कृपा असों द्यावी ।
सकळां सांगावी विनंती माझी ॥

बावांचं भान हारपलं. त्यांना श्रीहरि आलेला दिसायला लागला. हातांत शंखचक्र आहे. मुगुट त्याला आहे. कानीं कुंडलं आहेत. त्यांच्या तेजापुढं सूर्याचं तेजहि फिकं पडलं आहे. त्याचा रंग सांवळा आहे. तो चतुर्भुज आहे. गळ्यांत वैजयंती माळ आहे. पीतांबराच्या तेजानं दाही दिशा फांकल्या आहेत.

पैल आले हरि । शंख चक्र शोभे करीं ॥
मुगुट कुंडलाच्या दीप्तीं । तेजें लोपला गभस्ती ॥
मेघशामवर्ण हरि । मूर्ति डोळस साजिरी ॥
चतुर्भुज वैजयंती । गळां माळ हे रुळती ॥
पीतांबर झळके कैसा । उजळल्या दाही दिशा ॥

बावा आनंदानं वेडे झाले. ते म्हणाले,

" मंडळी, उशीर होतोय आतां. श्रीहरि माझी वाट पाहात उभा आहे ! मी चलतों ! "

वाढवेळ झाला उभा पांडुरंग ।
वैकुंठीं श्रीरंग बोलावितो ॥
अंतकाळीं विठो आम्हांसी पावला ।
कुडीसहित झाला गुप्त तुका ॥

अन् पाहतां पाहतां बावा दिसे[...] कुणाला दिसलं नाहीं ! ते सदेह वैकुंठाला [...]

IRBK 0106965
IRBK-0106965